# अमृत कुंभ




वर्ष ९ | अंक १ | एप्रिल - मे २०१५ | मूल्य रु. १०/-

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच "मन्मनाभव।''

# अमृत कुंभ

वर्ष ९ । अंक १ । एप्रिल - मे २०१५

## मुखपृष्ठाविषयी

*अलौकिक ब्राह्मण जीवनात जशी पुरुषार्थाद्वारे प्रगती होत जाते तशी मायादेखील पुरुषार्थामध्ये विघ्नरूप बनत असते. आपल्या स्वभाव-संस्कारातील जी कमजोरी असते त्यावर माया वार करीत असते.*

*काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार ही मायेची मुख्य रूपे आहेत. तसेच ईर्ष्या, द्वेष, घृणा, वैरभावना, आळस, परचिंतन, चंचलता, इत्यादी सूक्ष्म रूपे आहेत. खरं तर माया अर्थात सर्व विकारांचे मूळ आहे देह-अभिमान. त्यामुळे मायाजीत बनण्यासाठी मुख्य पुरुषार्थ आहे, 'आत्मअभिमानी बनणे व निरंतर योगी बनणे.' ईश्वरी ज्ञान व सहज राजयोगाच्या अभ्यासानेच आपण शिव-शक्तीस्वरूप बनतो. फलस्वरूप संपूर्ण निर्विकारी बनतो.*

*हाच आशय मुखपृष्ठावरील चित्रात दर्शविण्यात आला आहे. जसे गॅसने भरलेले फुगे हे वर-वर जात असतात तशी पुरुषार्थाद्वारे प्रगती होत असते. परंतु मायेचा बाण जेव्हा आपल्यातील सूक्ष्म कमजोरीवर आघात करतो तेव्हा सर्व संपते आणि वर जाणारा फुगा मध्येच फुटतो. परंतु जे संपूर्ण आत्मअभिमानी बनून, श्रीमतावर चालतात त्यांना मात्र मायेचा कुठलाही बाण स्पर्श करू शकत नाही. अशा पुरुषार्थींची सदैव उन्नती होत असते.*

*-- प्रकाशक, अमृतकुंभ.*

**वार्षिक वर्गणी रु. ६०/-**
**अर्धवार्षिक वर्गणी रु. ३०/-**
**आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-**

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या** www.amrutkumbh.com

## -- अंतरंग --

- परमधाम पावन घर आपुले (संपादकीय) २
- शिवबाबा अजब तुझे सरकार (कविता) ४
- त्वमेव माताच् पिता त्वमेव (भाग २) ५
- मुरलीधराची चमत्कारी मुरली (कविता) ७
- ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था... ८
- वाचकांशी हितगुज ११
- मानवा ! दिवस हे युग परिवर्तनाचे १२
- विकर्मापासून सावधान १३
- भोली दादीजींचा अलौकिक दिव्य अनुभव १६
- आपल्या संपन्न आत्मस्थितीला तडा देणारा खतरनाक मनोविकार - मोह (भाग २) १८
- व्यक्तिगत वा सामुहिक जीवनातील सर्व समस्यांचे मूळ कारण २३
- असे हे संगमयुगी वारसदार (कविता) २४
- तणावमुक्त जीवन जगण्यासाठी १८ सोनेरी सिद्धांत २५
- राजयोग - जीवन जगण्याची कला (अनुभव) २६
- सचित्र सेवावृत्त २९

**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२
E-mail :info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता** : बी.के.गोदावरी,
प्रकाशक अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्,
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के.गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योति इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज, लाईट हाउस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले - संपादक ब्र.कु.शिवाजी चौधरी.

संगणक अक्षरजुळणी : कु.मनिषा गोवळकर, ८ श्रीसदिच्छा सोसायटी, मीठ बंदर रोड, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३.

# परमधाम पावन घर आपुले,
# घरी नेण्यासाठी शिव पिता आले

आदि में आये थे, उस घर से, अन्त वहाँ ही जाना है,
आदि अन्त का मंत्र यही है, अब घर जाना है...

परमपिता शिव परमात्मा तसेच आपणा सर्व आत्म्यांचे घर परमधाम आहे. यालाच शांतीधाम, मुक्तिधाम, निर्वाण-धाम, ब्रह्मलोक, परलोक, शिवपुरी इत्यादी नावे आहेत. येथे सर्वत्र सोनेरी लाल रंगाचा प्रकाश पसरलेला असून त्याला ब्रह्मतत्व, सहावे तत्व किंवा महतत्व असे म्हणतात. येथे मनुष्यात्मे मुक्तीच्या अवस्थेत राहतात. येथे कुठलेही देह-बंधन, कर्म-बंधन नसते तसेच ना संकल्प, ना वचन, ना कर्म असते. प्रत्येक धर्माच्या आत्म्यांचे वेगवेगळे विभाग असतात. मुख्य म्हणजे या पावन घरात सर्व आत्मे पावन असतात. येथूनच आपण सर्व आत्मे या सृष्टीवर आपली निश्चित भूमिका बजावण्यासाठी येत असतो. अशा या परमधाम घराचं वर्णन श्रीमद्‌भगवद्‌गीतेतही केलेले आहे -

**न तद् भासयते सूर्यो, न शशांको न पावकः।**
**यद् गत्वा निवर्तन्ते, तद् धाम परम मम।** (अ.१५/६)

(भावार्थ : ज्या परमश्रेष्ठ धामाला सूर्य, चंद्र आणि अग्नि प्रकाशित करीत नाहीत ते माझे परमधाम आहे.)

**प्रत्येक आत्मा हा परमात्मा समान अविनाशी तसेच ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे. आत्म्याच्या मूळ (अनादि) स्वरूपात त्याचे गुण परमात्मा पित्यासमान असतात. परंतु आत्मा जेव्हा या साकार सृष्टीवर शरीर धारण करतो तेव्हा तो आपल्या मूळ स्वरूपाला विसरून जातो.** प्रारंभी तो सतोगुणी, नंतर रजोगुणी व शेवटी कलियुगात तमोगुणी बनून आपला पार्ट बजावित असतो. कलियुगाच्या शेवटी परमात्मा शिव पिता अवतरित झाल्यानंतर आत्म्यांना राजयोग शिकवतो. या राजयोगाच्या अभ्यासाने जे आत्मे पुन्हा पावन (सतोप्रधान) बनतात ते शिवबाबांच्या समवेत सन्मानपूर्वक आपल्या घरी परमधाममध्ये परत जातात. तसेच त्यांना मुक्ती व जीवनमुक्तीचा ईश्वरी जन्मसिद्ध अधिकार प्राप्त होतो. परंतु जे आत्मे राजयोगाद्वारे पावन बनत नाहीत, त्यांना मात्र धर्मराजपुरीत आपल्या विकर्मांची शिक्षा भोगून पावन बनावे लागते नंतर ते पावन परमधाम मध्ये जातात. त्यांना केवळ मुक्ती प्राप्त होते. स्वर्गातील जीवनमुक्ती मिळत नाही. अशाप्रकारे हे सृष्टीचे चक्र अव्याहतपणे फिरत असते. म्हणूनच या सृष्टीला मुसाफिर-खाना असेही म्हटले जाते. आपण आलो कुठून व आपल्याला परत कुठे जायचे आहे, याचे ज्ञान आजवर कुणालाही नव्हते. आता ते ज्ञानसागर शिव परमात्म्याकडून आपल्याला प्राप्त झाले आहे.

### ❒ चला परत आपुल्या घराकडे

**समयानुसार आपल्या प्रत्येकाच्या मनात हीच धुन असली पाहिजे की मला राजयोगाच्या अभ्यासाने पावन बनून आता परत आपल्या घरी जायचे आहे. कारण आपण हे जाणतो की हीच ती परमपावन मंगलवेळा आहे जेव्हा परमात्मा सृष्टीवर अवतरित होऊन आपल्याला राजयोग शिकवित आहेत.** राजयोग अर्थात देहसहित देहाचे सर्व संबंध विसरून, स्वतःला आत्मा समजून, स्नेहपूर्वक परमात्मा शिवपित्याची स्मृती होय. यालाच स्नेहयात्रा (मन-बुद्धीची यात्रा) असेही म्हणता येईल. या स्मृतीद्वारेच सर्व संबंध, सर्व प्रकृतीच्या आकर्षणापासून उपराम अर्थात साक्षी स्थितीचा अनुभव होईल. तसेच साक्षी बनल्याने आपण सहजच शिवबाबांचे साथी बनू. सर्वांना आपले स्वरूप ज्वालास्वरूप दिसेल. तेव्हाच विनाशज्वाला देखील स्पष्ट दिसू लागेल. तात्पर्य म्हणजे स्थापना करण्यासाठी निमित्त बनलेले ब्राह्मण आत्मे जितके ज्वालारूप बनतील तितकीच विनाशज्वाला देखील प्रत्यक्ष दिसेल. संघटित रूपातील ज्वालास्वरूप स्थिती, विश्वाच्या विनाशाचे कार्य संपन्न करेल.

आजवर अल्प आत्म्यांचा दृढ संकल्प अल्पकाळासाठी कुठे-कुठे विनाशज्वाला प्रज्वलित करण्यासाठी निमित्त बनला आहे. परंतु महाविनाश अथवा विश्वपरिवर्तन हे संघटनाच्या

एक श्रेष्ठ संकल्पाशिवाय संपन्न होणार नाही. त्यामुळे समयानुसार आपली पुरुषार्थाची अंतिम स्थिती ही सर्व बंधनांपासून मुक्त कर्मातीत स्थिती बनली पाहिजे, ती देखील संघटित रूपात. तेव्हाच एकीकडे विनाशाचे दृश्य व दुसरीकडे नवीन दुनियेच्या स्थापनेचे दृश्य दिसू लागेल. **त्यासाठी आता आपण संघटित रूपात तीव्र पुरुषार्थ करू या. कारण ब्राह्मण आत्मे जोपर्यंत बंधनमुक्त बनत नाहीत तोपर्यंत सर्व आत्म्यांसाठी परमधामचे दरवाजे खुलणार नाहीत. सर्व आत्म्यांना दुःख आणि अशांतीपासून मुक्त करण्याची जबाबदारी आम्हा ब्रह्मावत्सांची आहे.** म्हणूनच आपल्या मनात सदैव शुभचिंतन, शुभचिंतक, शुभभावना, परिवर्तनाची भावना, सहयोगाची भावना, करुणेची भावना जागृत असली पाहिजे.

❏ **अंतिम पेपरमध्ये पास होण्यासाठी सहनशक्तीची आवश्यकता** - अंतिम पेपर विनाशाचा आहे. त्यात पास होण्यासाठी सहनशक्तीची आवश्यकता आहे. परंतु बऱ्याच जणात सहनशक्तीची कमी आहे त्यामुळे ती वाढविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आपल्या संबंध-संपर्कात येणाऱ्या सर्वांचे स्नेही बना. जितका दुसऱ्याविषयी स्नेह असेल तेवढी सहनशक्ती आपोआपच प्राप्त होते. उदाहरणार्थ, कुठलीही आई आपल्या मुलावर जेव्हा एखादे संकट येते तेव्हा मुलावरील स्नेहामुळे तिच्यात सहनशक्ती येते. आपल्या मुलासाठी ती सर्व काही सहन करायला तयार असते. स्नेहामुळे तिला आपल्या शरीराची किंवा परिस्थितीची जरासुद्धा काळजी वाटत नाही. तसेच आपल्या मनात ज्यांच्याविषयी सदा स्नेह असतो, त्यांच्यासाठी सहन करणे ही गोष्ट मोठी वाटत नाही. परंतु स्नेह कमी असेल तर सहनशक्ती देखील कमी असेल. यासाठी मम्मा-बाबांना फॉलो करा व स्वतःला पूर्वज आत्मा समजा.

❏ **स्थापना आणि विनाशाचा आपसातील संबंध**

विनाशाचा समय हा ड्रामा अनुसार निश्चित आहे. परंतु हा ड्रामासुद्धा आपल्यावर आधारित आहे. आपण ब्रह्मावत्स आधारमूर्त आहोत. त्यामुळे स्थापनेचे कार्य जेव्हा संपन्न होईल तेव्हाच विनाशाकरिता ऑर्डर मिळेल. तात्पर्य म्हणजे अजूनही आपली स्थिती संपूर्ण बनली नाही म्हणूनच विनाश थांबला आहे. संघटीत रूपाने ब्राह्मणांनी आपल्या संपूर्ण स्थितीची अंगुली दिल्यानेच, कलियुगी पर्वत उचलला जाईल. याचीच यादगार शास्त्रातून गोवर्धन पर्वत सर्वांनी आपल्या अंगुलीने उचलला असे दर्शविण्यात आले आहे.

आज जसे विज्ञानवाले एक सेकंदात इशारा मिळताच विनाश करण्यासाठी तयार आहेत तशी आपली शक्तीसेना तयार आहे का? जर आपल्याला शिवबाबांनी एक सेकंदाचा इशारा दिला की सदा काळासाठी आत्मअभिमानी स्थितीत स्थित व्हा तर त्यानुसार आपण आत्मअभिमानी होऊन त्यावेळी त्या स्थितीत राहण्याचा प्रयत्न करू. परंतु सदा स्थित राहण्यासाठी बऱ्याच काळचा अभ्यास आवश्यक आहे. तो अभ्यास करण्यासाठी आपल्याला हा अधिक वेळ देण्यात आला आहे. त्याचा पुरेपुर फायदा घेऊ या.

सध्या आपण प्रकृतीच्या एकेक तत्वाचे विक्राळ रूप पाहत आहोत. अंतिम समयी प्रकृतीची पाचही तत्वे एकाच वेळी व अचानक वार करतील. त्यावेळी प्रकृतीचे कुठलेही साधन आपल्या बचावासाठी उपयोगी पडणार नाही. अशावेळी मास्टर महाकाल स्थितीत स्थित झाल्यानेच परिस्थितींचा सामना करता येईल. **तात्पर्य म्हणजे महाविनाश बघण्यासाठी मास्टर महाकाल बनावे लागेल. मास्टर महाकाल बनण्याची विधी आहे, स्वतःला अकालमूर्त आत्मा समजण्याची. जरासुद्धा देहभान असेल तर हार मानावी लागेल.** म्हणूनच अशरीरी भव हे वरदान आता-पासूनच कार्यात आणा.

अंतिम समयी समेटण्याची शक्ती अति आवश्यक आहे. कारण त्याद्वारेच देह, देहाचे संबंध, वस्तू, आवश्यक साधनांच्या प्राप्तीचे संकल्प समेटता येतील. आपल्या घरी परमधाममध्ये जायचे आहे, हा एकच संकल्प मनात असावा. अन्य कोणत्याही संकल्पाचा विस्तार होता कामा नये. बस, हाच संकल्प असावा की मी घरी गेलो की गेलो.

❏ **महाविनाश नव्हे हे तर स्वर्गाचे द्वार उघडण्याचे साधन** : आपण ब्रह्मावत्स मास्टर रचयिता आहोत. त्यामुळे मोठ्यात मोठी आपत्ती देखील मनोरंजनाचे दृश्य

अनुभव होणे ही आपली स्थिती असली पाहिजे. म्हणूनच महाविनाशाच्या आपत्तीला देखील मनोरंजनाचे स्वरूप दिले आहे. महाविनाशाला सुद्धा स्वर्गाचे द्वार उघडण्याचे साधन बनवले आहे. तात्पर्य म्हणजे कोणतीही समस्या वा आपत्ती आपल्याला मनोरंजन वाटली पाहिजे. त्यामुळे आपल्या मुखावाटे 'हाय-हाय' शब्दाऐवजी नेहमी 'ओहो' असे शब्द बाहेर पडले पाहिजेत.

**आता समयानुसार सर्वत्र दुःख-अशांतीची अनुभूती अति मध्ये जात आहे. अशावेळी आपल्या अंतिम स्थितीद्वारे ती समाप्त करण्याचे कार्य तीव्र गतीने करण्याची गरज आहे. त्यासाठी मास्टर रचयिताच्या स्थितीत स्थित होऊन, आपल्या रचनेचे दुःख व अशांती दूर केली पाहिजे.** आपल्या सुख-शांतीच्या खजिन्यातून आपल्या रचनेला महादान, वरदान दिले पाहिजे. मास्टर दुःखहर्ता व सुखकर्ता हा जो आपला संगमयुगातील पार्ट आहे, तो बजावला पाहिजे.

**❒ वर्तमानसमयी ब्राह्मण आत्म्यांचे कर्तव्य**

आज प्रत्येकजण आपल्या ईष्ट देवी अथवा देवतांना पुकारतो आहे. त्यांच्यापुढे क्षमायाचना करीत आहे. त्यांच्याकडे कृपा मागत आहे. **अशावेळी चेक करा की आपले देव आत्म्यांचे, ब्राह्मण आत्म्यांचे कर्तव्य काय आहे? संगमयुगातील आपले कर्तव्य आहे, सर्वांना दुवा (आशीर्वाद) देणे व दुवा घेणे. आपल्या जड मूर्ती आजही मंदिरात हीच सेवा करीत आहेत.** कसाही भक्त आत्मा असो तो आपल्या ईष्ट देवी-देवतेच्या दर्शनाने दुवा प्राप्त करतो. हीच आपल्या संगमयुगी कर्तव्याची ॲक्युरेट यादगार आहे. त्यामुळे आता दररोज तसेच दिवसभर आपल्या दृष्टी, वृत्ती, बोल व भावना यांच्याद्वारे दुवा द्या व दुवा घ्या. आपल्या संबंध-संपर्कात येणाऱ्यांची अशाप्रकारे सेवा करा हाच सर्वात सहज पुरुषार्थ आहे.

महत्वाची बाब म्हणजे आपल्या विरोधकाला देखील दुवा द्या. आपण पूर्वज आत्मे असल्याने दुसऱ्यांचे व्यर्थ बोल व व्यर्थ कर्म सामावून घेण्याची शक्ती धारण करा. विरोधक बदलला तर मी बदलेन, असे न समजता, मला स्वतःला बदलून विरोधकालासुद्धा बदलायचे आहे, ही शुभ-भावना बाळगा म्हणजे विरोधकांसाठीही आपल्या मनातून दुवा निघतील व त्याच्या बदल्यात आपल्यालाही दुवा मिळतील. आता समय तीव्र गतीने परिवर्तीत होत असल्याचे आपण पहात आहोत. सर्वच गोष्टी अति मध्ये जात आहेत. 'अति नंतर अंत' निश्चित आहे. अशावेळी आपण स्वपरिवर्तनाद्वारे विश्वपरिवर्तनासाठी आधारमूर्त बनले पाहिजे कारण आपण विश्वाचे आधारमूर्त व उद्धारमूर्त आत्मे आहोत. त्यामुळे सदैव सर्वांना दुवा देत राहा. आपल्या दृष्टी, वृत्ती, बोल व भावना यांच्याद्वारे सर्वांना दुवा द्या व दुवा घ्या. त्याचबरोबर परचिंतन, परदर्शन व परमत यापासून मुक्त बनून, परोपकारी बना म्हणजे सर्वांच्या दुवा मिळतील. या अनुषंगाने पुढील काव्यपंक्ती अतिशय उद्‌बोधक आहेत. त्यातील भाव अंतःकरणात भरून ठेवा म्हणजे आपले जीवन देवदूतासमान तसेच प्रभुप्रिय बनेल. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आपण अतिशय आनंदाने, शिवबाबांच्या समवेत आपल्या पावन घरी परम-धाममध्ये परत जाऊ. त्या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे-

**दिल से देते चलो दुवायें, सबका भला हो, सब सुख पाये,**
**जिनके है संकल्प सुहावन, वाणी बरसाती सुख सावन,**
**कर्म जिन्हों के पावन-पावन, जीवन उनका है मनभावन,**
**वो फरिश्ते पे प्रभु की नजर है, गुण गाती धरती अम्बर है।**

## शिवबाबा अजब तुझे सरकार!

शिवबाबा अजब तुझे सरकार।
सृष्टिचक्रात फिरविशी विश्वाचा संसार।। ध्रु. ।।
माहित नव्हता ईश्वर आजवर। मूर्ती पूजिल्या दोन युगांवर।
तूच रचता, आम्ही रचना, आज उमगले सार।। १ ।।
बिंदूरूप निर्मोही, अभोक्ता। चरचरावर तुझीच सत्ता।
पावन करूनी, देसी राजाई, महिमा तुझी अपार।। २ ।।
ब्रह्माच्या घेऊनी रथाला। स्थापन करी नवयुगाला।
नऊ लाखांच्या सत्ययुगाचे, चित्र करी साकार।। ३ ।।
नकोच काबा, तीर्थही काशी। भारत भूवर, मधुबन देशी।
अवतरला शिव, पिता जगाचा, एकच तारणहार।। ४ ।।
विकार ते बाबांना देऊनी। 'मामेकम्' ची याद करोनी।
अतींद्रिय सुख सदा घेऊनी, भवचिंता करू पार।। ५ ।।

***(ब्र. कु. वसंत निंबाळकर, कागल-कोल्हापूर.)***

# त्वमेव माताच् पिता त्वमेव

(भाग - २)

*ब्र.कु.हेमंतभाई, शांतिवन-आबू रोड.*

मानव जीवन म्हणजे एक यात्रा आहे. यात्रेत प्रिय संबंधी, सोबती, आवडती मित्र-मंडळी असली म्हणजे प्रवासाची मौजमजा आगळी-वेगळीच असते. तसेच जीवनात सुख देणारे, विश्वास, प्रेम व पदोपदी काळजी घेणारे नातेवाईक लाभले की जीवनाला अर्थ येतो. याउलट कटकट करणाऱ्या, गैरसमज करून पदोपदी नसत्या कटकटी करणाऱ्या आणि दुःख देऊन, सळो की पळो करून सोडणाऱ्या स्वार्थी नातलगांसोबत आयुष्य काढावे लागले तर रावणाच्या शोकवाटिकेत कैद झालेल्या सीतेसारखी स्थिती होते. ज्याप्रमाणे साधुच्या रूपात आलेल्या रावणाला सीता ओळखू शकली नाही तसेच सोनेरी हरिणाच्या लोभात फसली. परिणामतः ती श्रीरामापासून दूर गेली व पतीच्या सान्निध्य सुखाला पारखी झाली. तसेच मनुष्यही देहधारी नातेवाईकांना सदाकाळ सुख देणारे समजतो. त्यांच्या अल्पकालीन मोह-युक्त प्रेमाकडे आकर्षित होतो. माझे-माझे म्हणून आप्तेष्टां-मध्ये अडकतो. मी आणि माझे म्हणत मोहमायेच्या जाळ्यात फसतो. **या दुःखदायी जाळ्यातून मुक्त व्हायचे असेल तर आपल्याला विरक्त व्हावे लागेल अन्यथा संबंधांच्या दुःखातून मुक्ती नाही कारण दैहिक संबंधांतील विरक्ती हीच दैहिक दुःखाच्या मुक्तीची युक्ती आहे**.

व्यक्ती ही देहधारी असल्याने दुसऱ्या व्यक्तीशी सदा सर्वकाळ संबंध निभावू शकत नाही कारण तिला शारीरिक मर्यादा व बंधने असतात. समजा माता किंवा पित्याचा मृत्यु झाला तर मोठी बहीण आईसमान व मोठा भाऊ पित्यासमान असतो, असे मानतात. परंतु बहीण ही आई किंवा भाऊ हा वडील बनू शकत नाही कारण आई व बहीणीच्या किंवा पिता व भावाच्या प्रेमात जमीन-अस्मानाचा फरक असतोच. **तसेच कोणीही देहधारी व्यक्ती एकाच वेळी माता, पिता इत्यादी सर्व संबंध निभावू शकत नाही परंतु परमात्मा जो विदेही आहे, जो कधीच देहरूपी वस्त्र परिधान करीत नाही, त्याच्याशी मात्र आपण सर्व संबंधांचा सहज अनुभव करू शकतो**.

ईश्वरी संबंधांच्या अनुभूतीसाठी परमात्म्यावर दृढ निश्चयात्मक प्रीत बुद्धी असायला हवी. आपल्या मनमंदिरात प्रभुप्रीतीची अखंड ज्योत तेवत असेल, ईश्वरी श्रीमत पालन करण्यात दृढता असेल, अंतःकरणात आत्मियता, स्वच्छता व समर्पणता असेल तर प्रेमसागर परमात्मा सहजच आपला बनतो. सर्व संबंध निभावतो व अमर्याद सुखाचा अनुभव करवतो. **तेव्हा हृदय मंदिरात शिवबाबा फक्त तूच माझा व मीही तुझाच हा नाद गुंजत असतो. मन फक्त एकाशीच हितगुज करू लागतं. प्रभुप्रियतमा शिवाय जीवन अंगणात दुसरा कुणीही डोकावत नाही. अशावेळी परमात्मा आपल्याला सदैव सुखाचे सौरभ (अमृत) पाजू लागतो**. परमात्म्याच्या संबंधासाठी कर्मकांड करण्याची किंवा मंत्र जपायची गरज नाही. अंतःकरणाची स्वच्छता व सत्यता यांनी तो आकर्षित होतो. श्रद्धा व प्रेम भावनेने तो विरघळतो. मग हक्काने बोला-वल्यावर तो क्षणभरही उशीर न करता मदतीला धावून येतो. हीच त्याच्या प्रीतीची आगळी-वेगळी पद्धती आहे.

परमात्म्याला भोलानाथ म्हटले जाते. तो भोळ्यांवर सहजच प्रसन्न होतो. या अनुषंगाने भोलूची एक बोधप्रद कथा आहे. भोलू गरीब पण प्रामाणिक गुराखी मुलगा होता. रोज राना-वनात, डोंगरमाळी गुरे चारत असे. निर्मळ मनाने आभाळातील देवाशी गप्पागोष्टी करीत म्हणे, 'हे देवा, तू खाली ये ना. मला तुझ्याशी दोस्ती करायची आहे. तू जर खाली आलास तर मी तुला हिरव्या रानात फिरवीन. गोड फळे खाऊ घालीन. तुला गाईचे दूध पाजीन.' अशा बालभावनेने देवाशी हितगुज करीत असे. एके दिवशी रानातून एक पंडितजी (पुजारी) जात होते. त्यांनी भोलूच्या देवाशी चाललेल्या गप्पागोष्टी ऐकून भोलूला विचारले, हे पोरा, तू ही काय बडबड करीत आहेस ? तेव्हा भोलू म्हणाला की मी देवाशी गप्पा मारतोय. तेव्हा पंडितजी म्हणाले, देवाशी अशा गप्पा मारायच्या नसतात. देवाची प्रार्थना करायची असते. चल, मी तूला प्रार्थना शिकवतो. पंडितजीने भोलूला दोन संस्कृत श्लोक कसेबसे शिकविले. त्याचा परिणाम

असा झाला की त्याच्या देवाशी गप्पागोष्टी संपल्या. त्या रात्री देव पंडितजीच्या स्वप्नात आला व म्हणाला, तू आज एक मोठा अपराध केला आहेस त्या गुराखी मुलाला संस्कृत श्लोक शिकवलेस. तेव्हा पंडितजी म्हणाले, नाही देवा, मी तर आज त्या मुलाला प्रार्थना शिकवून मोठं पुण्यकर्म केले आहे. त्यावर देव म्हणाला, हाच तुझा अपराध आहे. यापूर्वी भोलू जे निष्पाप व निःस्वार्थ भावनेने बोलत असे, त्यात मला खूप आनंद मिळत असे. तुम्ही सर्वजण फक्त स्वार्थी मागण्या करीत असता. परंतु भोलू माझ्याकडून काहीही मागत नसे. भोळ्या भावनेने मला रिझवत असे. आता त्याचं निरागस बोलणं कधीच ऐकायला मिळणार नाही. तू प्रार्थना शिकवून, त्याच्या निष्पाप मनाची हत्याच नाही का केलीस? स्वप्न संपल व पंडितजींचे डोळे खाडकन उघडले.

खरोखर परमात्मा निःस्वार्थ प्रेमाचा सागर आहे तसेच शुद्ध भावनांचा तो भुकेला आहे. स्नेहाच्या भावपुष्पांनी प्रफुल्लीत होऊन तो सर्व संबंधांच्या सुखाचा वर्षाव करतो. ज्याप्रमाणे जन्मदात्री आई निःस्वार्थ प्रेम देते त्याप्रमाणे परमात्मा ही कसलीच अट न घालता प्रेमाची उधळण करतो. **वर्तमानसमयी तो निजधाम, परमधामहून या सृष्टीवर अवतरीत झाला आहे व आत्मारूपी आपल्या लाडक्या मुलांवर सर्व संबंधांचे सुख लुटत आहे. मानव जीवनात सर्व प्राप्ती करविणारे मुख्य अष्ट संबंध आहे.** परमात्मा परमपिता बनून स्वर्गाचा वारसा देतो. परमशिक्षक बनून उच्च पदाची प्राप्ती करवितो. परम सद्‌गुरु रूपाने मुक्ती व जीवनमुक्तीचे वरदान देतो. परम मातेचे रूप घेऊन अगाध वात्सल्य व निःस्वार्थ प्रेम लुटतो. बंधु बनून सहयोग देतो. सखा होऊन साथ निभावतो. पुत्ररूपात सहारा बनतो व साजन बनून आत्म्याचा शृंगार करतो. आता आपण या अष्ट संबंधांपासून होणारी प्राप्ती सविस्तर पाहू या.

**परमपिता :** जसा दैहिक (लौकिक) पिता आज्ञाधारी पुत्रास चल-अचल संपत्तीचा वारस हक्क (प्रॉपर्टी किंवा इस्टेट) देतो तसा परमात्माही संगमयुगात ज्ञान, गुण, शक्तींचा वारसाहक्क देतो. ज्ञान, गुण, शक्ती द्वारे जो आत्मा विकारांवर विजयी बनून सुखदायी श्रेष्ठ कर्म करतो, 'पवित्र बना, योगी बना' या आज्ञेचे पालन करतो त्या आत्म्यारूपी पुत्रास प्रारब्ध रूपात २१ जन्मांसाठी स्वर्गाच्या बादशाहीचा वारसाहक्क देतो.

**परमशिक्षक :** शिक्षक विद्यार्थ्यास शिक्षणाद्वारे डिग्री देऊन उच्चपद देतो. त्याचप्रमाणे परमशिक्षक नरास नारायण व नारीस लक्ष्मी बनण्याचे श्रेष्ठ शिक्षण देतो त्यामुळे सर्वगुण संपन्न, १६ कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी, मर्यादा पुरुषोत्तम व डबल अहिंसक या दैवी पदव्या मिळतात. त्या पदव्यांनी स्वर्गीय विश्वमहाराजन किंवा विश्वमहाराणीचे सर्वोच्च पद प्राप्त होते. (सत्ययुगात यथा राजा-राणी तथा प्रजा सर्व सुखी संपन्न सावकार असतात).

**परमसद्‌गुरु :** जसे देहधारी गुरु 'पुत्रवान-धनवान-आयुष्यवान भव' असा आशीर्वाद व वरदान देतात, त्याप्रमाणे परम-सद्‌गुरुही मुक्ती व जीवनमुक्तीचे वरदान देतो. प्रत्येक कर्मासाठी श्रीमत सांगतो. श्रीमत हाच सिद्धीचा मंत्र होय. जे पिता देऊ शकत नाही, शिक्षक शिकवू शकत नाही, ते गुरुच्या सिद्धीदायी मंत्राने मिळते. श्रेष्ठ बनविणारे श्रीमत 'सिद्धीस्वरूप भव' चे वरदान देते व आत्म्यात असंभव गोष्ट संभव करणारी जादूई शक्ती भरते.

**जगत्‌जननी :** जन्मदात्री माता वात्सल्य व ममतेने संततीचे संगोपन करते. विनाशर्त प्रेम लुटते. त्याचप्रमाणे परमात्मा या शब्दात शेवटचे अक्षर मा (माता) लपलेले आहे. निःस्वार्थ, अमर्याद-असीम प्रेम आईच देऊ जाणे. मुलाची चूक पोटात घालून क्षमा करणारी माताच होय. जेव्हा पिता रागावतो तेव्हा आईच मायेच्या (स्नेहाच्या) पंखाखाली सुरक्षित ठेवते. प्रेमसागर आणि क्षमासागर परमात्मा माता बनून अपार स्नेहानुभूतीने रक्षा करतो.

**बंधु :** जेव्हा विपत्ती येते. धर्मसंकट उभे राहते तेव्हा सुरक्षा व सहयोगाची हमी देणारा भाऊ आठवतो. ज्याचे यादगार पर्व आहे रक्षाबंधन व भाऊबीज. परमात्माही दीनबंधु बनून कलियुगाच्या अंती विकारांपासून रक्षण करून, आत्मिक परमपवित्र प्रेमाची भेट देतो. ज्यावेळेस आपण मनापासून धावा करतो तेव्हा तो सर्वशक्तिवान मदतीला पुढे येतो व सहयोगाच्या सहस्त्र भुजांनी आत्म्याची रक्षा करतो.

**सखा :** हृदयावर ओझं, मनावर दडपण असेल तर मित्रच आठवतो कारण जे कुणाला सांगू शकत नाही ते जिवा-

भावाचा दोस्त ऐकतो. परमात्म्यासारखा या जगात प्रामाणिक मित्र कुठे मिळेल? कोणत्याही क्षणी मनातल हितगुज तो ऐकतो व अंतःकरणाचा आवाज ऐकून प्रेमाचा प्रतिसादही देतो. रूप, रंग, जात-पात, गरीब-श्रीमंतीच्या साऱ्या भिंतींना ओलांडून, सुखाप्रमाणेच दुःख व दारिद्र्यात साथ देतो तोच खरे मित्रत्व निभावणारा आहे.

**पुत्र** : आयुष्याची सांज झाली, तन-मन-दुर्बल, निर्बल झाले तर हवा असतो जीवाला आधार. तेव्हा बालपणी करंगळी पकडून चालायला शिकवले तो पुत्र हाताची काठी बनतो व आयुष्याच्या अंती सांभाळ करणारा सहारा ठरतो. दैहिक मुलामुलींसमान परमात्म्यास पुत्र मानून, त्याखातर वेगळा वाटा काढला व तो ज्ञानयज्ञात सहयोगरूपात दिला तर त्याची परतफेड म्हणून स्वयं परमात्मा २१ जन्मात आधार बनून स्वर्गिक सुख देतो.

**साजन** : साजन सजनीचे नाते संपन्नता व संपूर्णत्वाची अनुभूती करविणारे सौभाग्याचे लेण होय. पती पत्नीची अर्धांगिनी, हृदयाची स्वामिनी तर पती प्राणनाथ, जीवनाचा खरा श्रृंगार करतो. **परंतु संगमयुगात परमपुरुष परमात्मा, प्रियतम साजन बनून सर्वगुण व पवित्रतेच्या १६ कलांनी आत्म्याचा श्रृंगार करतो. दिलसिंहासन देऊन दिलरुबा बनवितो. दैहिक पतीच्या मृत्युने वैधव्याचे दुःख मिळते. मात्र अमरनाथास वरल्याने अविनाशी सौभाग्य सुख लाभते.**

**या अष्ट संबंधासमवेत सर्जन व धर्मराज हे दोन संबंध अध्यात्माच्या पुरुषार्थीला महान मदत करणारे आहेत.** जसे रोग झाल्यावर वैद्य, डॉक्टर वा सर्जन निदान करून स्वास्थ्य बहाल करतो. त्याचप्रमाणे परमात्माही विकार, विकृतीचे आत्मिक रोग नाश करणारा वैद्यनाथ सुप्रीम सर्जन आहे. सच्चाई सफाईने एखादी कमी कमजोरी (भूतकाळात केलेले पापकर्म) त्यास सांगितले, तर तो ज्ञान योगाचे इंजेक्शन देऊन बरे करतो. परंतु त्यापासून रोग लपविला तर मात्र आजार वाढत जातो. या संबंधासोबत प्रेमाने त्याचे ऐकले नाही तर मार देऊनही विकार व विकर्मांपासून मुक्त करणारा व परमधामी पोहचविणारा धर्मराजही तो आहे. त्यास धर्मराज मानून आठवित राहिले तर आत्मा पापकर्मांपासून बचावतो. अर्थात धर्मराजपुरीच्या यातनांपासून मुक्त होऊन धर्मराजाची सलामी मिळवू शकतो.

जो ज्ञानी, योगी वा पुरुषार्थी परमात्म्यांशी सर्व संबंध जोडतो, त्यास देहधाऱ्यांच्या स्वार्थी, दिखावटी-बनावटी, अल्प सुख देणाऱ्या संबंधींकडून फसगत होत नाही. या उलट एखादा संबंध परमात्म्याशी जोडला नसेल तर तो संबंध दुःखदायी बनून मानसिक वेदना देत राहतो. त्या संबंधाची खेच दुःख देते. पुरुषार्थाच्या वाटेत मोठा अडथळा निर्माण करते. त्या संबंधीच्या मोहयुक्त आठवणी त्या योगसाधनेत मनबुद्धीवर वार करतात व योगाद्वारे प्राप्त होणाऱ्या परमानंदात विघ्न बनतात. **म्हणूनच त्या परमात्म्यास हृदयनाथ, प्राणनाथ बनविले; हृदयविणेच्या सर्वसंबंधाच्या तारा त्या सुखसागराशी जोडल्या. मन-बुद्धीचे तादात्म्य त्या प्रियकराशी केले तर जीवा-शिवाची जोडी जमेल. सर्व संबंधांच्या सुखाची सरिता वाहिल व ईश्वरी प्रेमाची हिरवळ पसरेल. दिव्यतेचा सुगंध दरवळेल. जीवनात स्वर्गसुख साकार होईल.** म्हणूनच शिवास जीवाचा संगी, साथी, सोबती बनवू या. खऱ्या अर्थाने 'त्वमेव माताच् पिता त्वमेव, त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव' या अनेक रूपात त्यास आळवू या. त्या बहुरूपीस रिझवू या व सुख-समृद्धीची बाग फुलवू या. ❖❖❖

## मुरलीधराची चमत्कारी मुरली

मुरलीधराची चमत्कारी, स्नेहल मधुर वाजे मुरली।
देहाचे मग भान हरपते, सच्चिदानंदी लागे टाळी ।। १ ।।
दिलारामच्या दिलावरती, धुंदीत दंगतो आत्माराम।
प्रभुरंगात रंगतो जीव, मौज मस्तीचे हे सुखधाम ।। २ ।।
यादयात्रा साकारते मग, सार समजता आगम-निगम।
आठवणीत मग राही निरंतर, शांतीधाम नि सुखधाम ।। ३ ।।
नसे जात-धर्म, देश-विदेश, आम्ही शिवाचे पुत्र ब्राह्मण।
या संगमी अवनीवरती, घर आमुचे एकच मधुबन ।। ४ ।।
जन्म आमुचा आशीर्वादे, वरदानांनी होते पालना।
प्रीत प्रभुची अमुची दौलत, तेच आमुचे भावजीवन ।। ५ ।।
प्रभुप्रेमाचा रंग मजेचा, अनुभवतो आम्ही संगमावर।
जुन्या संस्कारांची होळी, करण्या सांगे शिवसागर ।। ६ ।।

-- ***ब्र.कु. गुणवंत पाटील, बिबवेवाडी-पुणे.***

*(संदर्भ : 'गीतावली संगमयुगाची' काव्यसंग्रह)*

# ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

(भाग - ६)

ब्र.कु.रमेश शाह, गावदेवी - मुंबई.

मागील काही लेखातून मी सत्ययुगी दुनियेतील कार्य-व्यवहाराबाबत आणि त्या आधाराने वर्तमानसमयी असलेल्या ईश्वरी सेवेच्या कार्यव्यवहाराबाबत लिहित आहे. मला याबाबत एक पत्र आले होते त्यात विचारणा केली की, मी व्यवस्थापनाबद्दल का लिहित आहे? म्हणून मला असे वाटते की, या लेखाद्वारे यामागची पार्श्वभूमी आणि माझी भूमिका मी मांडावी.

यज्ञाचा कारभार आणि ईश्वरी सेवा यात खूप अंतर आहे. आपले पिताश्री ब्रह्माबाबा, मातेश्वरीजी, दादी प्रकाशमणीजी, दीदी मनमोहिनीजी इत्यादी सर्व जण यज्ञ कारभारामध्ये पूर्णरीतीने अनुभवी होते. ब्रह्माबाबा तर शिवबाबांचा रथ होते म्हणून डबल इंजिन या रूपाने, मातेश्वरींना माता या रूपाने, दादी प्रकाशमणीजी यांना सिंधीमध्ये 'मुन्नी मम्मा' म्हटले जाई, त्या रूपाने यज्ञ कारभाराचा अनुभव होता. अशाप्रकारे दादीजींना थेट ब्रह्माबाबाची पालना मिळाली. दादी जानकीजी सुद्धा वयाच्या २१व्या वर्षी समर्पित झाल्या आणि त्यांना यज्ञातील ४५ लहान मुलांचा सांभाळ करायचा अनुभव सुरूवातीला मिळाला होता, म्हणजेच या सर्वांना यज्ञ कारभाराचा अनुभव होता कारण हे सर्व १९३६ पासून ३६५ दिवस, २४ तास यज्ञातच रहात असत. परंतु माझ्यासाठी या सर्व गोष्टी निराळ्या होत्या कारण मला माझा व्यवसाय, घरदार आणि ईश्वरी सेवा या तिन्ही गोष्टी पहायच्या होत्या. या ईश्वरी सेवेत प्रदर्शनी बनविणे, गीते बनविणे असा कार्य-व्यवहार करीत होतो. तेव्हा माझ्या लक्षात आले की ईश्वरी सेवा आणि यज्ञाचा कारभार करण्यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. माझ्याकडे यज्ञ कारभाराचा अनुभव नव्हता, त्याचे एक उदाहरण सांगतो. सन १९६५ मध्ये मी जेव्हा एकदा मधुबनला आलो होतो तेव्हा ब्रह्माबाबा रात्रीचा क्लास घेत होते. बाबांनी ईशूदादीला क्लासमध्येच सांगितले की, दिल्लीचा जगदीश बच्चा आहे, त्याचा लेख आला आहे तो घेऊन ये. बाबांनी तो लेख माझ्याकडे दिला व म्हणाले की या लेखामध्ये काही आवश्यक वाटत असेल तर त्यात भर घाल. मी बाबांच्या या गोष्टीला खूप सहजपणाने घेतले कारण तेव्हा मला यज्ञ कार्यव्यवहाराचा अनुभव नव्हता आणि आम्ही सर्व बेपरवाह बादशहासारखे रहात होतो. दुसऱ्या दिवशी सकाळच्या क्लासमध्ये बाबांनी मला विचारले की तू तो लेख वाचलास का? त्यावर मी नाही म्हणालो. मुरली चालू होती म्हणून बाबा त्या दरम्यान काही बोलले नाहीत. परंतु नंतर त्यांनी मला बोलावून घेतले अन् विचारले की तू तो लेख का वाचला नाहीस? त्यावर मी साधारण रीतीने उत्तरलो की बाबा काल रात्री क्लासमध्ये आपण मला लेख दिला आणि रात्री काही विशेष कार्य नसल्यामुळे मी झोपून गेलो व आता सकाळी लवकर तयार होऊन मुरली क्लासमध्ये आलो, त्यामुळे माझ्याकडे वाचायला वेळच उरला नाही. त्यावेळेस बाबांकडून मला पहिला धडा मिळाला की यज्ञ सेवेचे जे काही कार्य असते ते शीघ्र झाले पाहिजे आणि त्यात कोणतीही सबब देता कामा नये.

मग तो लेख माझ्याकडून घेतला तेव्हा मी म्हणालो की बाबा आता मी वाचून देतो. **त्यावर बाबा म्हणाले की, नाही वत्सा, सेवेची संधी एकदाच प्राप्त होते, दुसऱ्या वेळेस मिळत नाही. यावरून मी एक गोष्ट शिकलो की यज्ञसेवेची संधी केवळ एकदाच मिळते आणि आपण ती आळस किंवा हलगर्जीपणामुळे घालविली तर दुसऱ्या वेळेस यज्ञसेवेची संधी आपण गमावून बसतो. प्रिय मातेश्वरीजी नेहमी सांगत असत की सोनेरी संधी पुन्हा येत नसते** (*Golden Opportunities Never Repeat*) आणि ही वास्तविकता आहे. गुजरातीमध्ये अशी म्हण आहे की जेव्हा लक्ष्मी टिळा लावायला येते तेव्हा काही जण तोंड धुण्यासाठी निघून जातात म्हणजेच काही लोक निष्काळजीपणाने कितीतरी चांगली संधी गमावून बसतात. हा माझ्यासाठी धडा होता. मग बाबा म्हणाले की आता लेख बाबाच तपासतील.

बाबांनी तो लेख वाचला, त्याचे उत्तरही दिले आणि सकाळी १० वाजेपर्यंत पोस्टाने पाठविला देखील. यातून मी एक गोष्ट शिकलो की ईश्वराचे कार्य आहे ते होणारच आहे. आपण नाही केले तर दुसरे कोणीतरी करेल किंवा तो स्वतःच करील. हा अविनाशी व अविरत चालणारा ड्रामा आहे जो चालत आहे आणि पुढेही चालत राहणार आहे म्हणून बाबा कुणालाही निमित्त बनवून ते कार्य करून घेतील.

तेव्हापासून मी यज्ञाबाबत कार्याच्या संबंधित कोणताही निर्णय त्वरीत घेण्याची गोष्ट पक्की शिकलो. म्हणून मला दररोज जी पत्रे वा ई-मेल्स् येतात त्याचे २४ तासांच्या आत उत्तर देतो, त्यात उशीर करीत नाही. यापासून मला दोन फायदे होतात, १) मला रोज ६०-७० ई-मेल्स् येतात जर मी त्याच दिवशी उत्तर दिले नाही तर दुसऱ्या दिवशी ते १२०-१४० व तिसऱ्या दिवशी १८०-२०० ई-मेल्स् होतील आणि मला जर त्यांची उत्तरे द्यायची झाल्यास त्यात माझा अर्धा दिवस निघून जाईल म्हणून ज्या दिवसाचे काम, त्याच दिवशी पूर्ण केले तर ते सहज होते. यासाठी म्हणतात की त्वरीत दान महापुण्य म्हणजे वेळेच्या अगोदर जर आपण आपले कर्तव्य पूर्ण केले तर त्यामुळे आपले पुण्य आणि श्रेष्ठ भाग्य बनते.

अशाप्रकारे दोन वर्षांनंतर बाबांनी मला सेवार्थ एका सेवाकेंद्रांवर पाठविले होते तेव्हा मी अशाप्रकारच्या सेवेबाबत अनुभवी नव्हतो. त्या सेवाकेंद्रामधील भाऊ-भगिनींमध्ये गैरसमजामुळे मने कलुषित झाली होती. तेथील बंधु-भगिनी नवीन-नवीन होते. त्यांना यज्ञाच्या कार्यव्यवहाराची माहिती नव्हती. त्यामुळे दुनियावी रितीने त्यांनी सांगितले की आमची ही गोष्ट तुम्ही बाबांना सांगा आणि त्यांनी ती स्विकार करावी अन्यथा आम्ही धरणे धरू. मी म्हटले ठीक आहे. जेव्हा मी ही गोष्ट बाबांना सांगितली तेव्हा बाबा खूप गंभीर झाले. **बाबा म्हणाले की मुला, मी सर्वशक्तिवान आहे. आपल्या कुणाच्या सहयोगाशिवाय मी एकटा विश्व-परिवर्तनाचे कार्य करू शकतो परंतु मी हे जर केले तर सर्व मुलांचे भाग्य कसे निर्माण होईल? तुम्हा सर्वांच्या भाग्य निर्मितीसाठी मी या सर्व सेवा तुम्हा मुलांद्वारे करवून घेतो.**

जर कधी कुणाला, कोणत्याही प्रकारची सेवा देऊ केली तर ती त्याने सहर्ष स्विकार करून आपल्या ेष्ठ भाग्याचे निर्माण केले पाहिजे. **तसेच त्या भाऊ-बहिणींच्या प्रश्नांना उत्तर देताना बाबा म्हणाले की मुलांनी नेहमी आपल्या मर्यादा पाळायला हव्यात कारण बाप हा बाप आहे आणि मुले ही मुले आहेत. बाप रचता आहे आणि मुले ही रचना आहे म्हणून त्यांनी नेहमी आपल्या मर्यादेतच राहिले पाहिजे. यज्ञाच्या कारभारामध्ये आंदोलन, धरणे इत्यादींचा प्रयोग होता कामा नये व तसे शब्दही मुखातून येऊ नयेत.** तेव्हा बाबांकडून मी असे शिकलो की बाबांनी ज्या कार्यासाठी मला निमित्त बनविले आहे, त्यामध्ये पुढे प्रगती करायची आणि कार्य करायचे आहे, जेणेकरून माझेच भाग्य बनेल.

सन १९६८ मध्ये ट्रस्टच्या निर्मितीचे काम सुरू झाले तेव्हा नोव्हेंबर १९६८ ते १५ जानेवारी १९६९ पर्यंत रोज ब्रह्माबाबांची पत्रे मला येत असत. ट्रस्टच्या संचालना-बाबत बाबा मला विविध गोष्टी शिकवित असत. त्यांनी खूप मार्गदर्शन केले त्यात प्रमुख दोन गोष्टींची शिकवण होती - १) व्याजाच्या मागे धावायचे नाही, २) ट्रस्टी म्हणजे सेवाधारी, शक्य होईल तितके सर्वांना ट्रस्टच्या माध्यमातून सहकार्य करायचे आहे.

या सर्व गोष्टींच्या आधाराने मी एक अनुभव पुन्हा लिहित आहे, जेणेकरून आपले जे नवीन ब्रह्मकुमार भाऊ-बहिणी आहेत त्यांना ही गोष्ट माहित होईल. गोष्ट १९६९ च्या डिसेंबरमधील आहे. मुंबईत प्रथमच यज्ञाद्वारे कॉन्फ-रन्सचे आयोजन केले जात होते. स्वतः दादी प्रकाशमणीजी जातीने त्यावर देखरेख करीत होत्या. त्यांच्यासोबत बरेच महारथी भाऊ-बहिणी आले होते. उदाहरणार्थ, दिल्लीहून जगदीशभाई, सुदेशबहेन (ज्या सध्या जर्मनीमध्ये आहेत). ही कॉन्फरन्स रविवारी समाप्त होणार होती. त्यापूर्वी एक दिवस अगोदर शनिवारी दुपारी प्रकाशमणी दादीजी मला म्हणाल्या की आम्ही सर्व बहिणींनी उद्या सकाळी ६ वाजता पीसमार्च काढायचे ठरवले आहे. तेव्हा माझ्या तोंडून उद्गार निघाले की दादीजी मी दोन दिवसांपासून नीट काही खाल्ले-पिल्ले नाही आणि तुम्ही पीस मार्च काढायला सांगता! यावर दादीजी खूप प्रेमाने म्हणाल्या की, रमेशभाई तुम्ही निमित्त आहात म्हणूनच ही गोष्ट मी तुम्हाला सांगितली.

जर तुम्ही नकार देत असाल तर हरकत नाही, मी मग दुसऱ्या कुणाकडून करून घेईन. मी भोजन करून मग तेथून निघून गेलो. कार चालवित असताना मला बाबांच्या श्रीमताचे प्रकंपन मिळू लागले की, जेव्हा दादीजीने तुला निमित्त बनण्याची संधी दिली होती तर तू त्यांना नकार कसा दिलास ? तू जर हो म्हणाला असतास तर तेच कार्य लोण्यातून एखादा केस सहजपणे बाहेर काढावा तसे कठीण वाटणारे कार्य बाबांनी पहाडाला मोहरीसमान व मोहरीला कापसासमान हलके बनविले असते. तेव्हा मी मनोमन बाबांशी वायदा केला की बाबा हे कार्य मी जरूर करेन. कॉन्फरन्सच्या वेळेस मी दादीजींजवळ गेलो व म्हणालो की, तुम्ही जर ही सेवा अद्याप कुणाला दिली नसेल तर मी ती अवश्य करेन. त्यावर दादीजी म्हणाल्या, ठीक आहे, तुम्ही ही सेवा करा.

नंतर कॉन्फरन्समध्ये व्यस्त झाल्यामुळे या कार्याची मला व दादीजींनाही विस्मृती झाली. रात्री जेव्हा आम्ही भोजनाच्या ठिकाणी एकत्र आलो तेव्हा दादीजींनी मला विचारले की रमेशभाई उद्या पीस मार्च (शांती यात्रा) आहे तेव्हा तुम्हाला कुणी मदत करायला तयार झाले की नाही ? त्यावर मला एकदम लक्षात आले की मी बाबांशी ही सेवा करण्याबाबत वायदा केला होता. मी एकदम उठलो. दादीजी म्हणाल्या की तुम्ही भोजन करून घ्या. त्यावर मी म्हणालो, आता भोजन काम पूर्ण झाल्यावरच करेन आणि मी निघून गेलो. पीस मार्च बाबतचे स्लोगन्स् (घोषणा) सुदेशबहेनजी जवळ होते. दादीजीने सुदेशबहेनला एका भाऊसह माझ्याकडे पाठवून दिले. आम्ही तिघेजण मुंबईच्या प्रिन्सेस स्ट्रीटला ते सायक्लोस्टाइल (चक्रमुद्रित) करायला घेऊन गेलो. परंतु त्यावेळेस बहूतेक दुकाने बंद होती. केवळ एकच दुकान उघडे दिसले जे बंद होण्याच्या तयारी होते. मी त्या दुकान-दाराला विनंती केली की कृपया आम्हाला लवकर सायक्लो-स्टाइल करून द्या. मी त्याला संस्थेच्या कार्याबाबत सांगितले व म्हणालो की याच्या ४०० प्रती हव्या आहेत. तो भाऊ म्हणाला की मी सिंधी आहे आणि या संस्थेला मी अगदी चांगल्यारीतीने जाणतो व माझे अनेक नातेवाईक या संस्थेत जात आहेत. तुम्ही मला सेवा करायची संधी दिली तेव्हा हे काम विनामूल्य करेन. मी याबाबत माझ्या नातेवाईकांना जरूर माहिती देईन. त्यांनाही खूप आनंद होईल.

हे कार्य पूर्ण झाल्यावर मी सुदेश बहेन व सोबत जो भाऊ होता त्याला म्हणालो की तुम्ही जाऊन भोजन करा, मी पोलीस स्टेशनची परवानगी घेऊन येतो. रात्रीचे ९.३० वाजले होते आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता 'पीस मार्च' निघणार होता. मला आठवण झाली की माझा एक नातेवाईक मोठा पोलिस अधिकारी आहे. मी त्यांच्याकडे गेलो व त्यांना घेऊन त्यांच्या ओळखीच्या पोलिस अधिकाऱ्याच्या घरी गेलो. तेथे पोहचताच प्रथम त्यांच्या कुत्र्याने, मग त्यांच्या पत्नीने व तद्नंतर त्यांच्या मुलाने आमचे स्वागत केले. त्यांच्या पत्नीने सांगितले की त्यांच्या पतिची रात्रपाळी असल्याने ते आता सकाळीच येतील आणि त्यानंतर तुमचे काम होईल. आम्ही परत जाणारच होतो, दरम्यान बाबांनी प्रेरणा दिली की, कां नाही शेजारच्या एखाद्या पोलिस अधिकाऱ्याशी बोलून घ्यावे ! आणि पुन्हा आम्ही पहिल्या पोलिस अधिकाऱ्याच्याच घरी गेलो व त्यांना म्हटले की कुणी जवळच राहणारा पोलिस अधिकारी असेल तर आम्हाला सांगा. त्यांच्या मुलाने सांगितले की समोरच्या इमारतीमध्ये एक अधिकारी आहेत. मी त्यांना ओळखतो, आपण त्यांच्या-कडे जाऊया. अशाप्रकारे आम्ही त्यांच्या मुलाबरोबर दुसऱ्या अधिकाऱ्याच्या घरी गेलो. तेव्हा त्या अधिकाऱ्याने सांगितले की, रॅली वा पीस मार्चसाठी परवानगी देणे माझेच काम आहे. त्यांनी मला विचारले की तुम्ही परवानगी घेण्यासाठी अर्ज आणला आहे कां ? मी म्हणालो, नाही. तेव्हा आमच्या सोबतच्या मुलाने सांगितले की, मी या काकांना ओळखतो. हे माझ्या वडिलांचे मित्र आहेत आणि म्हणून तुम्ही यांना परवानगी द्या. तुम्हाला हे काम करावेच लागेल अशी गळ घातली. त्यावर तो अधिकारी म्हणाला की तुम्ही जर सकाळी ६ वाजता पीस मार्च काढणार असाल तर मी ५.४५ वाजता तेथे पोहचेन. जेव्हा आम्ही रात्री भोजनाच्या स्थळी पोहचलो तेव्हा दादीजींनी मला पोलिस परवानगी विषयी विचारले. तेव्हा मी म्हणालो की, जादुगाराने आपली जादुगिरी दाखवली आणि एका चुटकीत सर्व काम झाले.

वरील गोष्टी सांगण्याचा उद्देश असा की जेव्हा आपण खऱ्या मनाने, हृदयापासून यज्ञसेवा करतो तेव्हा कितीही

कठीण वाटणारे कार्य असे सोपे सरळ होऊन जाते जणू लोण्यातून सहजच केस निघून जावा. अशाप्रकारे ईश्वरी सेवेतून मला जी शिकवण मिळत गेली, त्यातून मी शिकत गेलो व त्यानुसार कार्य करीत गेलो. **मी आपल्याला सांगू इच्छितो की बाबांचे कोणतेही कार्य अवश्य पार पडणारच. आपण जर नकार दिला तर त्यात आपलेच नुकसान होते कारण आपण आपल्या भाग्य निर्मितीपासून वंचित राहतो.**

सन १९६८ मध्ये मी एकदा बाबांना प्रश्न विचारला की, मला ईश्वरीय सेवाकेंद्र चालविण्याचा अनुभव नाही त्यावर बाबांनी वरदान दिले की, मुला, तोही अनुभव तुला प्राप्त होईल. जेव्हा १९७१ साली विदेश सेवेचा प्रारंभ झाला तेव्हा मी अमेरिकेला गेलो होतो. तेव्हा तेथे आम्हाला एक फ्लॅट मिळाला त्यात आम्ही ६-७ भाऊ-बहिणी रहात होतो. तिकडे सर्व वस्तू दूरवरून आणाव्या लागत. एकावेळी आम्ही भाजी, धान्य, पीठ, इत्यादी २५-२५ किलो वजन हाताने उचलून आणत असू. भ्राता जगदीशभाई झाडू मारीत असत, मी भांडी स्वच्छ करणे व कपडे धुण्याची सेवा करीत असे. अशाप्रकारे आम्हाला प्रारंभिक प्रशिक्षण मिळाले. त्याचबरोबर कमी खर्चामध्ये बालानशीन बनून कशी ईश्वरी सेवा करावी हे शिकलो.

मी हा लेख अशासाठी लिहिला की मला जसे ईश्वरी सेवेच्या कार्यव्यवहाराचे अनुभव मिळाले तसे अन्य भाऊ-बहिणींनाही मिळावेत आणि भविष्यात येणाऱ्या दुनियेमध्ये ते श्रेष्ठ पदाधिकारी बनावेत. आशा आहे की ज्या भाऊने मला पत्र लिहिले आहे त्याला उत्तर मिळाले असेल आणि या आधाराने अन्य भाऊ-बहिणींनाही स्वतःचे श्रेष्ठ भाग्य निर्माण करण्याची प्रेरणा अवश्य प्राप्त होईल.

***(भावानुवाद : ब्र.कु. जयश्री, विक्रोळी-मुंबई)***

## या, गुणवान बनू या

***गुणवान बनण्यासाठी*** - ईश्वरावर संपूर्ण निष्ठा, आत्म्यामध्ये आध्यात्मिकता, विचारात श्रेष्ठता, वृत्तीत शुभभावना, दृष्टीत पवित्रता, वाणीत मधुरता व सत्यता, कर्मात कुशलता व महानता, सेवेत नम्रता, व्यवहारात सरळता, आहारात सात्विकता, व्यक्तिमत्वामध्ये रमणिकता धारण करू या.

## वाचकांशी हितगुज

● अमृतकुंभ व अमृतकलश या दोन्ही द्वैमासिकांचा विचार करता सन २०१५-१६ हे मराठी द्वैमासिकाचे ३१वे वर्ष आहे. आम्हाला अतिशय आनंद होतो की आजवर वाचकांनी अतिशय उत्तम प्रतिसाद दिला. यापुढेही तो असाच मिळत राहील कारण मराठी भाषिक बंधु-भगिनींपर्यंत ईश्वरी ज्ञान पोचविणारे हे एकमेव द्वैमासिक आहे. त्यामुळे प्रत्येकाने अधिकाधिक सभासद संख्या वाढविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवावे व ईश्वरी सेवा वृद्धींगत करण्यासाठी आवश्यक तो सहयोग द्यावा, हीच शुभभावना व शुभकामना !

● **काही सेवाकेंद्रांकडून 'अमृतकुंभ'ची सन २०१५-१६ ची मागणी अद्याप प्राप्त झाली नसल्याने, संबंधित टीचर भगिनींनी ती फोन, ई-मेल वा स्पीड पोस्टद्वारे त्वरीत कळवावी. तसेच वर्गणीची रक्कम शक्य तितक्या लवकर पाठवून ईश्वरी सेवेत सहयोग द्यावा. मुख्य म्हणजे चालू वर्षाची वर्गणी ही मागील वर्षा इतकीच ठेवण्यात आली आहे.**

● अमृतकुंभद्वारे ईश्वरी ज्ञान अमृत, विश्वभरातील मराठी भाषिक बांधवांपर्यंत पोचवता यावे, यासाठी दिनांक २७ फेब्रुवारी २०१४ पासून अमृतकुंभच्या नवीन संकेत स्थळाचे (वेब साइटचे) अनावरण करण्यात आले आहे. या संकल्पनेची माहिती आपल्या मित्रपरिवाराला देत जावी. www.amrutkumbh.com या संकेत स्थळाला त्यांना भेट देण्यास सांगावे.

● आपले विशेष काही अनुभव, लेख, कविता तसेच काही सूचना असल्यास त्या अवश्य कळवाव्यात.

**दुसरी विशेष गोष्ट म्हणजे २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' म्हणून घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे अमृतकुंभचा 'जून-जुलै' चा अंक दरवर्षी 'राजयोग विशेषांक' म्हणून प्रकाशित केला जाईल. त्यासाठी लेखक बंधु-भगिनींनी राजयोगाची अनुभूती, राजयोगाद्वारे होणारी प्राप्ती, राजयोगाद्वारे जीवन परिवर्तन इत्यादी विषयांवर आधारित लेख अवश्य पाठवावेत.** त्या लेखांची गुणवत्ता विचारात घेऊन ते प्रकाशित केले जातील. - ***प्रकाशक, अमृतकुंभ.***

# मानवा! दिवस हे युग परिवर्तनाचे

*ब्र.कु.दत्तात्रय भाई, वसंतनगर-नांदेड.*

युग परिवर्तन होत आहे, ही गोष्ट निश्चित आहे कारण कलियुगाचा अंतिम समय आता चालू आहे. कधीही काहीही होऊ शकते किंबहुना सध्या आपण विश्वभरात थोड्याफार प्रमाणात विनाशलीला पहात देखील आहोत. तात्पर्य म्हणजे कलियुग जात आहे व लवकरच या भारतभूमीवर सत्ययुग पुन्हा स्थापन होत आहे. **म्हणूनच समयानुसार प्रत्येकाने स्वपरिवर्तन तसेच विश्वपरिवर्तन करण्यासाठी तीव्र पुरुषार्थ करण्याची आवश्यकता आहे. 'बहुत गयी, थोडी रही, अब थोडी की भी थोडी रही' अशी या पतित सृष्टीची स्थिती आहे. कलियुगी सृष्टी ही जणू मृत्युशय्येवर अंतिम श्वास घेत आहे.** ही मनुष्य सृष्टी काम-क्रोधादी विकारांच्या चितेवर आज जळत असलेली आपण सर्वजण बघतही आहोत. सृष्टीच्या महाविनाशासाठी ॲटम बॉंब, हायड्रोजन बॉंब तसेच क्षेपणास्त्रेही (*Missiles*) निर्माण केली गेली आहेत. (नुकतेच मागील वर्षी चीनने महामिसाइल बनवले आहे, ज्याची रेंज १२ हजार किलोमीटर इतकी आहे. त्यामुळे जगातील कुठलेही ठिकाण ते क्षेपणास्त्र अगदी थोड्या वेळात उध्वस्त करू शकते.) तेव्हा आताही जर कोणी म्हणत असेल की महाविनाश अजून खूप दूर आहे तर तो अज्ञान निद्रेत गाढ झोपला आहे व आपलेच अकल्याण करीत आहे, असे म्हणावे लागेल. म्हणूनच प्रत्येकाने अज्ञान निद्रेतून जागे होऊन, दुसऱ्यांनाही जागविण्याची आवश्यकता आहे. अजूनही कलियुगाची ४० हजार वर्षे बाकी आहेत, असे समजणे ही फार मोठी अज्ञानमूलक चूक आहे.

**या पतित सृष्टीला पावन बनविण्यासाठी पतितपावन निराकार परमात्म्याचे दिव्य अवतरण, ब्रह्माबाबांच्या तनात सन १९३६ मध्ये झाले आहे. मागील ७८ वर्षांपासून परमात्मा शिव पिता, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालयाद्वारे विश्व-परिवर्तनाचे कार्य करीत आहेत.** त्यामुळे ईश्वरी ज्ञान आणि सहज राजयोगाद्वारे, आपण प्रत्येकाने पावन बनण्याचा पुरुषार्थ केला पाहिजे कारण 'विनाशकाले प्रीतबुद्धी विजयन्ति आणि विपरीत बुद्धी विनश्यन्ति' हे गायन वर्तमान समयाचेच आहे. आता बेहदचा पिता शिव परमात्मा, सर्व आत्म्यांना बेहदचा वारसा देण्याकरिता आला आहे. मग कोणी मुक्तीचा वारसा घेईल तर कोणी जीवन-मुक्तीचा वारसा घेईल. प्रत्येकाला वारसा मिळणार जरूर आहे. कोणीही त्यापासून वंचित राहणार नाही कारण शिवबाबा बेहदचा पिता आहे, बेहदचा मालक आहे. कोणी योगबलाने आपले जन्मोजन्मीचे पाप भस्म करू शकले नाहीतरी शिवबाबा आले आहेत, एवढे जाणल्याने सुद्धा काही प्रमाणात का होईना वारसा हक्क जरूर प्राप्त करतील. **त्यामुळे आपल्या प्रत्येकाच्या अंतःकरणात हीच शुभ-भावना व शुभकामना असली पाहिजे की आपल्या सर्व बंधु-भगिनींनी परमात्मा पित्याकडून बेहदचा वारसाहक्क प्राप्त करावा.** सदैव आपल्या रोम-रोमात हीच खुशी वा नशा असला पाहिजे की ज्याला आपण जन्म-जन्मांतर शोधत होतो, तो भगवंत आता आपला बनला आहे. त्यामुळे सदैव हेच गीत ओठावर पाहिजे -

**हो गया भगवान हमारा, खुशियोंकी बरसात है।**
**ढूँढते थे जिसको दर-दर, वो हमारे साथ है।।**
**छोडकर अपना वतन वो, खुद खुदा है आ गया।**
**रूप जो आदम में देखा, रूप मन को भा गया।**
**साथी बनके साथ देता, स्वर्ग की सौगात है।।**

जेव्हा अशाप्रकारची आपली स्थिती असेल तेव्हा विनाश देखील लीला अथवा मनोरंजन अनुभवाला येईल. जसे सागरात कितीही मोठे तुफान आले तरी खिवैया (नावाडी) व नैया (नाव) दोन्ही मजबूत असतील तर कसलीच भीती वाटत नाही. उलट तुफान देखील एक तोहफा (उपहार) बनून जातो. म्हणूनच गायन केले जाते, 'जिसको राखी साई (शिवबाबा) उसे मार सके न कोई'. **त्यामुळे विनाशाची चिंता नसावी, फक्त चिंता असावी ती निरंतर योगी बनण्याची. त्यासाठी सदैव हा स्वमान बाळगा की मी शिवशक्ती अवतार आहे. फलस्वरूप स्वपरिवर्तन तसेच विश्वपरिवर्तन सहजच होईल.** ❖❖❖

# विकर्मापासून सावधान

*ब्र.कु. भगवानभाई, शांतिवन-आबू रोड.*

वर्तमान संगमयुगाचा काळ हा हिरेतुल्य आहे. या पुरुषोत्तम संगमयुगात अनेक जन्मांच्या भक्तीचे फळ देण्या-साठी स्वयं निराकार शिव भोलानाथ या सृष्टीवर ब्रह्माच्या तनामध्ये अवतरित होऊन, सहज राजयोगाच्या माध्यमातून जन्म-जन्मांतरासाठी भाग्य बनविण्याचे महान कार्य करीत आहेत. कित्येक महान भाग्यशाली आत्मे, गुप्तरूपाने अवतरित झालेल्या परमात्म्याला ओळखून, आपले भाग्य बनवित आहेत. या संगमयुगाला वरदान आहे की एक पुण्य कर्माचे फळ हजार गुणा मिळते कारण परमात्म्याची यावेळी आपल्याला मदत असते. म्हणूनच हा मार्ग सोपा वाटू लागतो. आपण हिंमतीचे एक पाऊल टाकतो व परमात्मा आपल्याला हजार पावलांनी मदत करतो. म्हणूनच आपण ८४ जन्माची शिडी संगमयुगातील एका जन्मातच चढतो. या शेवटच्या जन्मात आपण जेवढे पुण्यकर्म करू तेवढेच ६३ जन्मातील विकर्मांचा विनाश लवकर होईल व आपण कर्मातीत बनून, सत्ययुगामध्ये उच्चपद प्राप्त करू शकू.

परंतु हेही लक्षात ठेवा की शिव परमात्मा जेवढा भोळा आहे तेवढाच तो कर्माचा हिशेब ठेवणारा व हिसाब-किताब घेणाराही आहे. **संगमयुगात जर आपल्या हातून विकर्म होत असतील तर त्या विकर्माचा हजार गुणा दंड सुद्धा मिळत असतो. म्हणूनच संगमयुगात आपल्याला प्रत्येक पावलावर सावधान होऊन चालण्याची आवश्यकता आहे. याचेच गायन आहे, 'चढे तो चाखे वैकुंठरस, गिरे तो चकनाचूर'.**

काही ब्रह्मावत्स मला विचारतात की आम्ही ज्यावेळी या ज्ञानमार्गात आलो होतो तेव्हा आमची स्थिती खूपच चांगली होती. परंतु आता काय झाले, हे आम्हालाच समजत नाही. आमची खुशी गायब झाली आहे. आमचा योग लागत नाही. सहज ज्ञानमार्ग आता कठीण वाटू लागला आहे. या सर्व प्रश्नांचे मूळ कारण म्हणजे पुरुषार्थी जीवनात आपल्या हातून कळत-नकळत काही चुका घडत असाव्यात. त्या चुकांमुळे सूक्ष्म विकर्म बनून, आपल्या खात्यामध्ये एका विकर्माची शिक्षा हजार गुणा नोंदली जात असेल. म्हणूनच पुरुषोत्तम संगमयुगात ब्राह्मण बनल्यानंतर आपल्या हातून कोणतेही विकर्म होऊ नये, याची दक्षता घेणे, ही काळाची गरज आहे.

विकर्म तीन प्रकारची असतात १) मागील ६३ जन्मातील (द्वापर व कलियुगातील) विकर्म २) या जन्मातील लहान पणापासून ते ज्ञानमार्गात येईपर्यंतचे विकर्म ३) ब्रह्मामुख वंशावली ब्राह्मण बनल्यानंतर कळत-नकळत केलेली विकर्म.

**१) मागील ६३ जन्मातील विकर्म** - ही कमी करण्यासाठी जेवढे आपण वेळात वेळ काढून योगबळ जमा करू तसेच निरंतर आत्मस्थितीमध्ये वा ज्वाला स्वरूप स्थितीमध्ये टिकून राहू तेवढी ती कमी होत राहतील. त्याचबरोबर वर्तमानसमयी सुद्धा आपण विकर्मांपासून वाचू कारण योग-बळामुळे आत्मिक सुख प्राप्त होते. त्यामुळे मन-बुद्धी एक परमात्म्याच्या प्रभावाशिवाय अन्य व्यक्ती-वस्तूच्या प्रभावा-पासून दूर रहाते. फलस्वरूप आपल्या हातून विकर्म होत नाही. म्हणूनच शिवबाबा मुरलीतून सांगतात की मुलांनो, नेहमी माझी आठवण करीत राहा म्हणजे तुम्ही विकर्मापासून वाचू शकाल तसेच मागील विकर्मांचे ओझे कमी होत जाईल.'

**२) या जन्मातील लहानपणापासून ते ज्ञानमार्गात येई-पर्यंतचे विकर्म** - या विकर्मांचे ओझे कमी करण्यासाठी या जन्मात ज्या काही चूका झालेल्या आहेत, त्या कधी एकांतात बसून, चिठ्ठीवर लिहून शिवबाबांना सांगा किंवा मनातल्या मनात त्या चुकांविषयी क्षमायाचना मागितल्यानंतर पुन्हा त्या होणार नाहीत, याची दक्षता घ्या म्हणजे विकर्मांचे ओझे कमी होऊन जाईल.

**३) ब्रह्ममुखवंशावली ब्राह्मण बनल्यानंतरचे विकर्म** - ब्राह्मण बनल्यानंतर एका विकर्माचे ओझे हजार गुणा विकर्मा-मध्ये आपल्या खात्यात नोंदवले जाते. म्हणूनच आपल्याला ब्राह्मण बनल्यानंतर खूपच सावधान रहायला हवे. जर का आपण लहान-मोठ्या विकर्माकडे लक्ष न देता, तसेच विकर्म करत राहिलो तर ती वाढत जाऊन, परमात्म्याच्या पालने-पासून, ब्राह्मण परिवारापासून तसेच पुरुषोत्तम संगमयुगापासून

दूर घेऊन जातील. इतकेच नव्हे तर संगमयुगाचा वेळ सुद्धा पश्चात्तापातच जाईल. अंतिम समयी धर्मराजाची सजा भोगावी लागेल आणि नापास म्हणून निकाल हाती येईल. त्यामुळेच ब्राह्मण बनल्यानंतर विकर्म होऊ नयेत ही दक्षता ठेवणे गरजेचे आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे ब्राह्मण बनल्यानंतर केलेली विकर्म ही परमात्म्याला सांगून, लिहून देऊनसुद्धा कमी होत नाहीत. परंतु त्यापासून एकाची हजार गुणा शिक्षा मिळते कारण आपण ज्ञानी आहोत, समजूतदार आहोत. या अनुषंगाने महाभारतातील एक प्रसंग नमूद करावासा वाटतो.

एकदा युधिष्ठीर व दुर्योधन यांच्यापैकी योग्य राजकुमार कोण आहे, याची परीक्षा घेण्यासाठी अचानक दरबार भरविण्यात आला. त्या दरबारात चार गुन्हेगार व्यक्तींना पकडून आणले. सर्वप्रथम दुर्योधनाला विचारले की या चौघांनी मिळून एका व्यक्तीचा खून केला आहे. समजा भविष्यात तुझ्यापुढे अशाप्रकारची केस आली तर तू त्यांना काय शिक्षा देशील? ते ऐकताच दुर्योधन जोशाने म्हणाला की मी या चौघांचा शिरच्छेद करण्याची शिक्षा देईन. पुन्हा हाच प्रश्न युधिष्ठीराला विचारण्यात आला. तेव्हा तो गंभीर होऊन, विचार करत म्हणाला की या चौघांची जात (कूळ) जाणू इच्छितो. इतक्यात शकूनी मामा उठून उभा राहिला व जोरात म्हणाला यात जातीचा काय प्रश्न आहे? माझ्या भाच्याने जो निर्णय दिला आहे तो योग्य आहे. यावर गुरु द्रोणाचार्य म्हणाले की जातीचा, कुळाचा संबंध आहे. तेव्हा युधिष्ठीराला सांगण्यात आले की चारी खुनीपैकी एक शुद्र कुळाचा आहे, दुसरा वैश्य आहे, तिसरा क्षत्रिय आहे व चौथा ब्राह्मण आहे. हे ऐकून युधिष्ठिर म्हणाला की जो शूद्र आहे त्याच्या अपराधाची शिक्षा ही २ वर्षाचा कारावास आहे. जो वैश्य आहे त्याला ४ वर्षाचा कारावास आणि जो क्षत्रिय आहे त्याला ६ वर्षाचा कारावास अशी आहे. परंतु जो ब्राह्मण आहे त्याला काय शिक्षा द्यायची हे मी सांगू शकत नाही. त्याच्या अपराधाची शिक्ष गुरु द्रोणाचार्य ठरवतील.

तात्पर्य म्हणजे हे सर्व प्रसंग वर्तमान संगमयुगात घडतात, त्याचीच यादगार शास्त्रात नमूद केलेले असतात. शूद्र बनून केलेली विकर्म माफ होऊ शकतील. वैश्य व क्षत्रिय यांनासुद्धा काही प्रमाणात माफ होऊ शकतील. **परंतु ब्राह्मण बनून केलेली विकर्म माफ होऊ शकणार नाहीत. कारण ब्राह्मण अर्थात ज्ञानी, समजूतदार, त्याला एकाची हजार गुणा प्राप्ती होत असताना, त्याने कळत-नकळत केलेले विकर्म सुद्धा माफ होऊ शकत नाही. म्हणूनच शिवबाबा ब्रह्मावत्सांना नेहमी सावधान करीत असतात. परंतु याकडे कित्येकांचे दुर्लक्ष होते. म्हणूनच सर्वांचा अभ्यासक्रम एक असताना, शिक्षक एक असताना, भविष्यातील पद सर्वांचे भिन्न-भिन्न असते.**

वर्तमानसमयी आपल्या हातून होणाऱ्या विकर्माची काही कारणे व त्याविषयीचे निवारण आपण थोडक्यात पाहू या

**१) सायन्सच्या साधनांना आधार बनविणे** - तशी तर सायन्सची साधने ही बेहद विश्वसेवेसाठी किंवा स्वउन्नतीसाठी मदतगार जरूर आहेत. परंतु जेव्हा आपण त्या साधनांना उन्नतीचा आधार बनवतो तेव्हा ती साधने विघ्नरूप बनू शकतात. जेव्हा आपण त्या साधनांच्या वशीभूत होऊन, त्यांचा दुरुपयोग करतो किंवा साधनेकडे दुर्लक्ष करतो, तेव्हा ती साधने बाधक बनतात, कित्येक युवा साधकांवर अशा साधनांचा विपरीत परिणाम होताना दिसत आहे. **कारण इंटरनेटद्वारे अश्लील फोटो, मुव्ही, अश्लील साहित्य सहजच उपलब्ध होते. यांचा साधकाच्या मन-बुद्धीवर वाईट परिणाम होतो. मन चंचल होते, मनाची एकाग्रता होत नाही. सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे पवित्र राहणे अवघड वाटू लागते. त्यामुळे या गोष्टींपासून सावधान रहा अन्यथा स्वर्गाची बादशाही गमवून बसाल. आता समयानुसार बेहदचे त्यागी व तपस्वी बना.**

काही युवक मला प्रश्न विचारतात की मनात अपवित्रतेचे संकल्प वा विकल्प चालतात, यावर काय करावे? योग नीट लागत नाही. तेव्हा मी त्यांना विचारतो की तुम्ही मोबाइलवर इंटरनेटचा वापर करता का? तेव्हा ते म्हणतात की इंटरनेटद्वारे खूप माहिती मिळते परंतु त्याबरोबर व्यर्थ व नकारात्मक माहिती अगदी सहजच मिळते, याकडे बहुतेकांचे दुर्लक्ष होते. माया म्हणते, तू सफेद वस्त्र घालून, बॅज लावून थिएटरमध्ये तर येऊ शकत नाहीस, मग मीच तुझ्या खिशात येते. त्यामुळे आता खिसा हा सिनेमा थिएटर

झाला आहे. बरेच जण व्हॉटस् ॲप, फेसबुक, युट्यूब इत्यादी उशिरापर्यंत बघतात. त्या संकल्प-विकल्पामुळे अमृतवेळा व मुरली क्लास यावरसुद्धा परिणाम होतो. एकदा का ब्राह्मण जीवनाचा पाया कमजोर झाला की माया अधिक बलशाली बनत जाते. साधकाचे पुराने संस्कार पुन्हा प्रकट (इमर्ज) होऊ लागतात. त्यामुळे सायन्सच्या साधनांचा दुरुपयोग टाळा. ईश्वरी नियम व मर्यादांचे पूर्णतः पालन करा.

**२) श्रीमतामध्ये मनमत मिसळणे** - ईश्वरी श्रीमत हे आत्म-उन्नतीचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. **परंतु कधी-कधी आपण श्रीमतामध्ये मनमत मिसळून त्याचा वापर करतो तेव्हा आपल्या हातून विकर्म घडतात, तसे होऊ नये यासाठी श्रीमतावर काटेकोर चालण्याची दृढ प्रतिज्ञा करा.** जन्मोजन्मी आपण मनमत व परमत (रावणमत) यावरच चालत राहिलो. म्हणूनच कळत-नकळत आपल्या हातून अनेक विकर्म होत गेली. त्यामुळे आता अतिशय दक्ष राहण्याची गरज आहे.

**३) योगबळाची कमी असल्यामुळे विकर्म होतात** - योगबळ जमा करण्याकडे जेव्हा आपले दुर्लक्ष होते, लौकिक व अलौकिक कार्यात व्यस्त होतो (कर्मयोगी स्थिती नसेल) तर देहभान जागृत होते. परिणामी आपण कर्मेंद्रियांच्या वश होतो, साधन-सुविधांच्या अधीन होतो. आसक्ती वाढत जाते. अशाप्रकारे विकर्मांची सुरूवात होते. ज्यावेळी आपण रोज विधीपूर्वक किमान २ ते ३ तास बैठक योगाद्वारे परमात्म अनुभूती करतो त्यावेळी मनोबल वाढते तसेच अतींद्रिय सुखाचा अनुभव होतो. साहजिकच देह व देहाच्या दुनियेचे वैराग्य निर्माण होते. त्यामुळे कर्मयोगी, सहजयोगी, निरंतर योगी ही अवस्था टिकून राहिल्याने, आपण विकर्मा-पासून मुक्त होतो.

**४) आपसातील मतभेद, परचिंतन आणि अवगुणग्राही दृष्टिकोन** - ईश्वरी नियम वा मर्यादांचे उल्लंघन केल्यामुळे किंवा योगसाधनेच्या कमतरतेमुळे देहभान जागृत होतो. त्यामुळे एक दुसऱ्यातील कमी-कमजोरी दिसू लागते. त्याविषयी जेव्हा मनात वारंवार चिंतन केले जाते अथवा इतरांजवळ वर्णन केले जाते तेव्हा त्या व्यक्तीविषयी घृणा वा द्वेषभावना जागृत होते. त्याच्यापासून हळू-हळू किनारा करू लागतो. त्याला सन्मान देऊ शकत नाही. परिणामतः वायुमंडल खराब होते व आपसातील संघटन तुटते. **त्यामुळे शिवबाबा नेहमी सांगतात की संगदोषापासून सांभाळ करा व इतरांविषयीच्या आपल्या भावना कधीही खराब करू नका. सदैव प्रत्येकाचे अनादि, आदि व फरिश्ता स्वरूप पाहा.**

**५) सेवेच्या सफलतेच्या अभिमानामुळे विकर्म होतात** - वास्तविक कर्ताकरविता शिव पिता, आपल्याला निमित्त बनवून, विश्वपरिवर्तनाचे कार्य करीत आहे. आपण केवळ निमित्त आहोत परंतु सेवेच्या सफलतेमुळे जसजसा आपल्याला मान-सन्मान प्राप्त होत जातो तसतसा अभिमान जागृत होतो आणि दुसऱ्यांकडून अधिक मान-सन्मान प्राप्तीची इच्छा बळावत जाते. परिणामतः कथनी व करनी यामध्ये महद् अंतर स्पष्टपणे दिसू लागते. ते पाहून कित्येक जण नाराज होतात व ज्ञानापासून दुरावतात. हे सुद्धा विकर्म आहे. **त्यामुळे ईश्वरी सेवेतील आपला पार्ट कितीही महान असला तरी स्वतःला ईश्वरी सेवाधारी अथवा विश्वसेवाधारी समजा. आपल्यातील निमित्त भाव कधीही कमी होता कामा नये. याद्वारेच आपण अंतिम निरहंकारी स्थितीपर्यंत पोहचू.**

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ईश्वरी सेवेतील आपली भूमिका जेवढी मोठी तेवढीच आपली जबाबदारी मोठी, हेही लक्षात ठेवले पाहिजे. **जर आपल्या चुकीच्या व्यवहारामुळे, स्वभाव-संस्कारामुळे एखादी जिज्ञासू अथवा ब्राह्मण ज्ञान सोडून गेला अर्थात तो परमात्मा पित्यापासून दूर गेला तर याला ब्रह्महत्या असे म्हटले जाते. हे महापाप आहे. ब्रह्महत्येला माफी नसते.** ब्रह्महत्येच्या पापापासून मुक्त होण्यासाठी खूप कठीण तपस्या करावी लागली, अशाप्रकारचे वर्णन शास्त्रात देखील आढळते. तात्पर्य म्हणजे कर्माची गती अति गहन आहे. त्यामुळे श्रीमताच्या विरूद्ध कोणतेही कर्म होणार नाही, याची दक्षता बाळगायची आहे.

वर्तमानसमयी माया सर्व शक्तीनिशी अंतिम वार करीत आहे. तेव्हा मायेचे सूक्ष्म डावपेच ओळखून, आपण विकर्मा-जीत अर्थात मायाजीत बनले पाहिजे तरच आपण 'मायाजीते जगत्‌जीत' बनू. त्यासाठी सदैव हे लक्षात ठेवा -

**कर्म करो ऐसे भाई तुम, पडे न फिर पछताना।**
**एक दिन तो धर्मराज को, पडेगा मुख दिखलाना ।।**



# भोली दादीजींचा अलौकिक दिव्य अनुभव

*तसे पाहिले तर शिवबाबांची सर्वच मुले अति महान आहेत व त्यापैकी पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे कित्येकांचे सौंदर्य पसरत असलेले दिसते. परंतु त्यागाची साक्षात देवी 'भोली दादी' यांचे दिव्यत्वही अतिशय शोभिवंत होते. त्यांचे गहन समर्पण, साधे सरळ जीवन व मोहक स्मित हास्य सर्व आत्म्यांवर कायमची छाप पाडत असे. ज्यांच्या मनाला मानमरातबाची कामना कधी शिवली नाही, त्यांच्याच भाव-पूर्ण शब्दात त्यांचा अनुभव मनात बिंबवणारा आहे.* ***दादाजींनी शेवटच्या क्षणापर्यंत यज्ञसेवा केली व सर्वांना संतुष्ट केले. त्यांनी दिनांक ९ फेब्रुवारी २००७ रोजी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला व त्या अव्यक्त वतनवासी बनल्या. त्यांचा अनुभव अतिशय प्रेरणादायी आहे. अशा अन्नपूर्णा मातेला कोटी-कोटी प्रणाम! -- संपादक.***

माझे लौकिक नाव देवी होते. जेव्हा मी १३ वर्षांची होते तेव्हा कराचीत 'ओम मंडळी' एखाद्या वादळाप्रमाणे फारच चर्चेचा विषय झाली होती. कोणी तिला शांतीचे स्थान म्हणून त्यात सामील होऊ इच्छित होता आणि कोणी घर बिघडून टाकणारी मंडळी असे सांगून कुप्रचार करण्यात मग्न होता. अशावेळी लहान वयातच माझे लग्न एका संपन्न परिवारात झाले होते. पण माझ्या सासरची मंडळी कमी हुंडा मिळाल्याने माझा छळ करीत असत. मला बरीच कामे करावयास लावीत आणि पहिल्याच वर्षात माझे जीवन अशांतीच्या अंतिम सीमेपर्यंत जाऊन पोहोचले होते. मी शांतीसाठी रोज श्रीलक्ष्मी-श्रीनारायणाच्या मंदिरात जात असे.

त्याचवेळी माझी भेट मंदिरात माझ्या चुलत बहिणीशी घडली आणि तिने माझी दुःखमय कहाणी ऐकून माझा परिचय ओम मंडळींशी करून दिला. तिने म्हटले की तेथे ओम राधा इतकी सुंदर भजन गाते की त्यामुळे मन शांतीच्या तरंगांनी ओतप्रोत होते. मी मग तिचे (मम्मांचे) भजन ऐकण्यास तेथे गेले. सुंदर, गोड स्वरातून निघणाऱ्या त्या ओळींनी 'मी ओम मंडळीत काय पाहिले' माझ्या मनात वैराग्याचा पायाच घातला आणि माझे मन शांतीच्या सागरात बुडून गेले. तेव्हा ओम मंडळींचा सत्संग मम्माच करवीत असे. मला ध्यानी दादींच्या योगाद्वारे फार सुख मिळाले आणि मग मी निर्णय घेतला की माझ्या शेष जीवनाचा काळ आता येथेच व्यतीत करायचा.

परंतु माझ्या या ईश्वरी आकर्षणाची माहिती माझ्या सासरच्या मंडळींना कळताच त्यांनी कटु वचनाचे प्रहार पिताश्री ब्रह्माबाबांच्या चारित्र्यावर करण्यास प्रारंभ केला आणि तेथे जाण्यापासून अडवू लागले. अनेक सुखसोयींचे प्रलोभन देऊ लागले. परंतु माझे मन तर प्रभुप्रेमात अनुरक्त झाले होते हे पाहून त्यांनी मला हैदराबाद (सिंध) येथे नेले. या कारणाने की माझा ओम मंडळींशी संपर्क तुटावा. अशाप्रकारे तेथे मी तीन वर्षे राहिले.

हैद्राबाद येथे माझे आई-वडील राहत होते. तेथे माझे मन बाबांना भेटण्यासाठी फारच चिंताग्रस्त होत असे. तेव्हा एके दिवशी जेव्हा सर्व सासरची मंडळी मंदिरात गेली होती तेव्हा मी तेथून निघून माहेरी गेले. मी माझी दुःखी-कष्टी जीवनाची परवड कशी होत आहे ते आईला सांगितले. माझी करुण कहाणी ऐकून आईचे डोळे पाणावले आणि तिने मला धीर देत पुन्हा तेथे न पाठविण्याचे आश्वासन दिले. परंतु तेव्हाच माझी सासू पाच मातांबरोबर तेथे येऊन पोहोचली आणि तिने मला चांगली वागणूक देण्याचे वचन दिले व माझ्या आईला नमस्कार करून मला परत सासरी घेऊन गेली. पण माझे मन काही तेथे लागेना. मी पुन्हा माहेरी आले व मग पुन्हा कधी सासरी गेले नाही. मला आठवते, तेव्हा हैद्राबादहून तळमळयुक्त पत्र बाबांना लिहित होते की बाबा आपण मला कधी बोलवाल. माझ्या जीवनरूपी नावेचे नाविक तर आपणच आहात. जर आपण मला आश्रय नाही दिला तर मी पाण्याविना माशाप्रमाणे मरून जाईन. तेव्हा बाबांची फारच धैर्य वा सांत्वना देणारी पत्रे मला मिळत असत. ती पत्रेच त्यावेळी मला खरा आधार देत असत.

नंतर एका रात्री १२ वाजता निघणाऱ्या गाडीने मी

आपल्या आई-वडिलांसोबत बाबांकडे आले आणि रातोरात पिताश्री ब्रह्माबाबांना भेटले. मी म्हटले होते, बाबा, मी कोठे जाऊ? आपण माझे रक्षण करा. माझे बोलणे ऐकून त्या दयेच्या सागराचा कंठ करुणेने दाटून आला आणि बघणाऱ्यांनी त्यांच्या डोळ्यात दोन चमकणारे मोती पाहिले होते ज्यात माझी भविष्याची तस्वीर दडलेली होती.

बाबांनी माझ्यासाठी एक वेगळे घर घेतले आणि मी आपल्या आई-वडिलांसोबत तेथे राहू लागले. मी रोज शिलाई शिकण्यास व ज्ञान ऐकण्यास ओम मंडळीत जात होते. आता माझ्या जीवनाची कळी उमलू लागली होती. तेव्हा माझी एक छोटीशी मुलगीही होती, जी आता मधुबनात मीरा या नावाने ओळखली जाते.

पण अजून माझे कर्म-खाते समाप्त झालेले नव्हते. एके दिवशी पहाटे ४ वाजता माझे पती चार व्यक्तींना घेऊन घरात घुसले. माझ्या मांडीवर मीरा होती, त्यांनी मीरेला दूर फेकले. माझ्या आई-वडिलांना खूप मारपीट केली व मला ८० पायऱ्यांवरून फरफटत खाली घेऊन आले आणि मोटार गाडीत घालून आपल्या घरी घेऊन गेले. तेव्हा माझे कपडे फाटून गेले होते. डोक्यातून रक्त वहात होते आणि मी बाबा-बाबा म्हणत ओरडत होते. तेव्हा पहाटेचे ६ वाजले होते. त्यावेळी मला माझ्या पतीने बरीच प्रलोभने देऊ केली. परंतु माझी आई पोलिसांकडे तक्रार करून आली होती. तेव्हा सुमारे १० वाजता तेथील सुभेदार तेथे येऊन पोहचला. सर्व तपासणी झाल्यानंतर मला घोडागाडीत बसवून कोर्टात नेण्यात आले. तेथे मला साऱ्या गोष्टी सांगण्यास सांगितले. नंतर खटला सुरू झाला आणि पतीने कित्येक उलटया-सुलटया गोष्टी सांगितल्या. खटला तीन वर्षे चालला आणि निकाल माझ्या बाजूने झाला. तेव्हा मी अनुभविले की शिवबाबा माझ्याद्वारे अशा गोष्टी न्यायाधीशाला सांगत होते की ज्यांचे मला ज्ञानच नव्हते.

अशाप्रकारे माझे दुःख व चिंतेचे ढग नाहिसे झाले आणि माझ्या जीवनात सुखशांतीचा सूर्य उदय पावला. मला सेवा करण्याची फार आवड होती. बाबांनी मला ३५ लहान यज्ञवत्स सांभाळण्यासाठी दिले. त्यांचे पालन मी कित्येक वर्षे एका मातेप्रमाणे करीत राहिले. मला बाबांचा स्नेह व मस्तकाचे तेज फारच आकर्षित करीत असे. मला बाबांवर पूर्ण विश्वास होता. मी नेहमी विचार करीत असे की किती सौभाग्यशाली आहे मी, मला भगवानाबरोबर राहण्याची संधी मिळाली आहे. कानांनी त्यांचे मधुर बोल ऐकत आहे आणि त्यांची प्रत्येक लीला पहात आहे. नंतर मला मम्मांची सेवा करण्याची संधी मिळाली आणि मग काही काळानंतर भंडाऱ्यात भोजन बनविण्याची सेवा. तेव्हा मी ३५० भावा-बहिणींचे भोजन बनवीत असे आणि नंतर तर संपूर्ण भंडाऱ्याची जबाबदारीसुद्धा बाबांनी मला दिली तसेच अविश्रांत (अथक) भव हे वरदानही दिले. मी अलौकिक जीवनात सर्व काही पाहिले. भगवंताचे अपार प्रेमही पाहिले आणि शिक्षणाचा श्रृंगारही पाहिला. बाबांची लोकविलक्षण मस्तीही पाहिली आणि राजोचित थाटही पाहिला.

**बाबा रोज स्वयंपाकघरात दोनदा येत असत. मी बाबांना म्हटले होते की आपण स्वयंपाकघरात रोज चक्कर टाकण्यास जरूर या. बाबा रोज येऊन माझी पाठ थोपटीत असत तेव्हा माझे डोळे पाणावत असत आणि सारा थकवा बाबा त्या हातांनी दूर करीत असत. बाबा माझ्यासाठी वरदानाचे दोन बोलही रोज बोलत असत.**

कधी बाबा येऊन म्हणत, 'मुली, फार सेवा करीत आहेस.' 'अमर रहा, मुली.' कधी म्हणत, 'तू तर अखंड ज्योति आहेस.' कारण मी फार कमी झोपत असे. कधी सांगत, 'तू अथक आहेस, ऑल राउंडर आहेस.' माझे बाबांवर अपार प्रेम होते. मी प्रतिक्षा करीत असे की बाबा कधी येतील. बाबा मला सांगत असत, 'मुली, जेव्हा कधी आवश्यकता असेल तेव्हा याच स्वयंपाकघराच्या कपड्यातच माझ्यापाशी येत जा.' जेव्हा कोणी मदतीला नसे तेव्हा बाबा म्हणत असत की मुली, मी मदत करू का? बाबा म्हणत की मुली, जरी मी झोपलेला असेल तरी तू येऊन मला उठवीत जा. असे होते आमचे बाबा प्राणाहून प्रिय बाबा!

पिताश्री अंतिम दिवशी १८ जानेवारीलाही स्वयंपाक-घरात आले होते आणि म्हणाले होते, 'मुली, मी आलो आहे, असे म्हणू नकोस की बाबा आले नाहीत.' मला काय माहित होते की ते बाबांचे शेवटचे बोल होते. नंतर तो

▶ पान क्र. २८ वर

# आपल्या संपन्न आत्मस्थितीला तडा देणारा खतरनाक मनोविकार - मोह

(भाग - २)

*ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे.*

मोहवश होण्याचे संस्कार प्रथमतः पुराणकथांच्या द्वारे केले गेले आहेत. रामायणात श्रीरामाच्या जीवनातील मोहवश होण्याचा एक उत्कट प्रसंग दर्शविला आहे. राम-रावण युद्धात मेघनाद द्वारे लक्ष्मण मुर्छित झाला असता, श्रीरामाचा मोह जागृत होऊन तो शोकाकुल होतो तर श्रीसीतेला सुवर्णमृगा-विषयी मोह निर्माण झाल्याने पुढील सर्व रामायण घडल्याचे सांगितले जाते. **विचार करा, ज्या मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाला भारतीयांनी आदर्श मानले आहे तोच श्रीराम मोहवश झाला असेल तर आजचा मानव मोहातून कसा मुक्त होईल? महाभारतातही माता कुंतीला अनेक वेळा मोहवश झाल्याचे दर्शविले आहे.** तिला विवाहापूर्वीच आपल्या पहिल्या पुत्राला जन्म देण्याचा मोह निर्माण झाला त्यातून शूरवीर कर्णाचा जन्म झाला. प्रथम पांडव असलेल्या या कर्णाने आपल्याच सख्ख्या भावांविरूद्ध युद्ध केले. युद्धात तो धारातिर्थी पडला आणि मोहवश कुंतीचा शोक अनावर झाला.

या पुराण कथानंतर मोहग्रस्त व शोकग्रस्त होण्याचे पक्के संस्कार गेल्या शतकापासून चित्रपट व दूरदर्शनने केले आहेत. चित्रपटात असे दर्शविले जाते की नायकाच्या निकट नात्यातील व्यक्तीचा मृत्यु झाला असता स्वतः नायक तर रडतोच शिवाय प्रेक्षकांच्या डोळ्यातूनही तो अश्रू काढतो आणि त्याच्या प्रेयसीचा मृत्यू झाला तर त्याचा चेहरा खिन्न व उदास होण्यास वेळ लागत नाही. याशिवाय आमचे किती घट्ट प्रेम आहे हे सिद्ध करण्यासाठी नायक-नायिकेने जीवहत्या केल्याचेही दर्शविले जाते. **मोहवश होण्याकडेच आजच्या समाजाचा कल आहे. मोहजीत बनण्यासाठी मात्र कोणीही प्रयत्न करताना दिसत नाही कारण पतनाचा मार्ग सुलभ असतो. खरे तर आत्मोन्नती करून नष्टोमोहः बनण्यासाठी भगवद्गीतेचे पठण सर्वसामान्य माणसे करीत नाहीत** व कोणी ते पठण कधी काळी केले तर त्यावर मनन-चिंतन व ज्ञानचर्चा न केल्याने ते ज्ञान आत्म्यात रुजत नाही. फलस्वरूप त्याची धारणाही होत नसल्याने त्यांच्यावर दुःखद प्रसंगी मोहवश होण्याची वेळ येते. म्हणून आजचा मानव दुःखात अर्थातच तामस सुखात बद्ध झाला आहे म्हणून गीतेच्या अठराव्या अध्यायात म्हटले आहे की 'जे सुख आरंभी व अंति मोहग्रस्त करते ते तामस सुख होय' (१८-३९). या अंतिम अध्यायात गीता ज्ञानाच्या आधारे अर्जुनाला नष्टोमोहः बनविण्याचा उद्देश सफल झाल्याचे दर्शविले आहे. परिणाम स्वरूप अर्जुनाने आपला मनोभाव स्पष्ट केला की, तुझ्या कृपाप्रसादाने माझ्या मनातील मोह पूर्णतः नष्ट झाला आहे. आता माझ्या मनात कोणताही संशय राहिलेला नाही. मला माझ्या कर्तव्याची स्मृती व जाणीव झाली आहे. मी युद्ध करण्यास तयार आहे (१८-७३).

**बंधुंनो, केवळ कोणा एका अर्जुनाला मोहमुक्त करण्याचे गीतेचे प्रयोजन निश्चितच नाही. भगवद्गीतेचा महान उपदेश तर विश्वातील सर्व मनुष्यआत्म्यांसाठी आहे.** परंतु गीतेच्या या व्यापक प्रयोजनाला न समजल्याने व केवळ रामायणातील श्रीरामाचे मोहवश होणे बुद्धीत राहिल्याने आजचा मानवही मोहवश होऊन पतित प्रवाहात शीघ्र वेगाने वाहत चालला आहे. या विवेचनावरून भगवद्गीता व रामायणाची मोहा-विषयीची मते परस्पर भिन्न आहेत असेच म्हणावे लागेल. भगवद्गीतेत मोहाविषयी परखड मत व्यक्त केले आहे की, मोह हा मनुष्यआत्म्याचे अकल्याण करणारा आहे म्हणून त्याने मोहमुक्त व्हावे. परंतु रामायणात मात्र अप्रत्यक्षपणे भगवद्गीतेच्या विपरित मत व्यक्त करून श्रीरामाला मोहवश झाल्याचे दर्शविले आहे. असे मोहवश होणे अयोग्य आहे हे रामायणाच्या लेखकाने स्पष्ट करावयास हवे होते परंतु ते स्पष्ट न केल्याने तसेच श्रीरामाची वास्तविक जीवन-कहाणी ज्ञात नसल्यामुळे संपूर्ण निर्मोही असलेल्या श्रीरामाला मोहवश झाल्याचे दर्शवून रामायणाच्या लेखकाने अप्रत्यक्षपणे आपले मनुष्यमत व्यक्त केले आहे की, मोहवश होणे हा मानवी स्वभाव आहे. **फलस्वरूप सर्वसामान्य माणसे हाच**

**विचार करतात की जर श्रीरामासारखा देवात्मा मोहवश व शोकवश होतो तर आपल्या सारख्यांनी मोहवश होणे अपरिहार्य आहे. अशाप्रकारे आजचा मनुष्यआत्मा वास्तविक गीता-ज्ञानापासून दूर भटकत चालल्याने सत्यमार्गदर्शक सत्य परमात्म्याला सत्यगीताज्ञान द्यावे लागते, जे ज्ञान तो वर्तमान-समयी देत आहे.**

बंधुनो, गीताग्रंथात काल्पनिक व्यक्तिरेखा असलेल्या अर्जुनाचा मोह नष्ट झाल्याचे दर्शविले आहे आणि आपण ब्रह्मावत्स तर प्रत्यक्ष भगवंताकडून गीताज्ञान अर्जन करणारे वास्तविक अर्जुन आहोत. गीताग्रंथापेक्षाही अधिक काही ज्ञान परमात्मा देत आहेत. **केवळ या परमात्म ज्ञानातच नरापासून श्रीनारायण व नारीपासून श्रीलक्ष्मी पद कसे प्राप्त करावयाचे तसेच नर्कातील मोहमायेच्या दुर्गतीतून मोहमुक्त अशा स्वर्गाची प्राप्ती करून आत्म्याची सद्‌गती कशी करावयाची याची यथार्थ विधी आहे. असे हे सर्वोत्कृष्ट परमात्म ज्ञान श्रवण करूनही काही ब्रह्मावत्स मोहमुक्त होत नाहीत ते विश्वातील महान आश्चर्य नव्हे काय?** यावरून त्यांना आदि, अनादि स्वरूपाची, पूज्य स्वरूपाची, त्रिकालज्ञानाची व स्वदर्शन चक्रधारीची स्मृती पक्की झाली नाही असेच म्हणावे लागेल. तुम्ही सर्व आत्मे सत्ययुगात मोहमुक्त देवात्मे होता ही दिव्य स्मृती सर्व ब्रह्मावत्सांना प्रदान करून स्वयं परमात्म्याने सद्‌गतीची वाणी उच्चारली आहे की, 'वत्सांनो, पुनश्च तुम्हालाच मोहमायेने मुक्त अशा देवत्वपदाची प्राप्ती करावयाची आहे. परमात्म्याने प्रदान केलेल्या दिव्य स्मृतीचा हा सोमरस यथार्थतः प्राशन केला तर आत्म्याला चढलेल्या नारायणी नशेमुळे माया मोहाच्या शृंखला एका क्षणार्धात तुटतील. या शृंखला तोडण्याचा पुरुषार्थ मम्मा, बाबा व अन्य आदि रत्नांनी करून दाखविला आहे. मनुष्य आपल्या दृढ संकल्पाने हिमालयाचे एव्हरेस्ट शिखर जिंकू शकतो तर मास्टर सर्व-शक्तिवान मोहाचे शिखर जिंकू शकणार नाही काय? हे शिखर जिंकावयाचे असेल तर मनात ही कायमस्वरूपी संकल्पना हवी की हा देह माझा नाही, देहाचे संबंधी माझे नाहीत. इतकेच नव्हे तर विविध क्षेत्रात संपर्कात आलेले सर्व मनुष्यआत्मे ही त्या शिवबाबांची संतान आहेत. **विश्व हाच मज आत्म्याचा परिवार आहे, विश्वातील सर्व आत्म्यांशी माझे केवळ भ्रातृत्वाचे संबंध आहेत अर्थात आत्मा-आत्मा भाऊ-भाऊ! ही संकल्पनाच मोहावर सहज व पूर्णतः विजय प्राप्त करून देईल. असा विजय तुम्ही प्राप्त केलात तर या लेखाचा उद्देश फलीभूत झाला आहे असे म्हणता येईल.**

आपली प्रवृत्ती पवित्र आहे, हा नशा ब्रह्मावत्सांना अवश्य आहे परंतु त्या प्रवृत्तीत मोह असेल तर प्रवृत्तीला संपूर्ण पवित्र प्रवृत्ती म्हणता येणार नाही. बंधुंनो, तुम्ही केवळ ब्रह्मचर्याचे व्रत घेतलेले नाही. तुम्ही व्रत घेतले आहे विश्वकल्याणाचे, सुखकर्ता, दुःखहर्ता बनून विश्वाला सुख-शांतिमय करण्याचे, सर्व धर्मातील सर्व आत्म्यांना मुक्ती-जीवनमुक्तीचा मार्ग दाखविण्याचे, प्रत्येक आत्म्याला परमात्म परिचय व परमात्म संदेश देण्याचे, येथील एक-एक कण पावन करून भारतात अखंड दैवी स्वराज्य स्थापन करण्याचे व भविष्यात इष्ट देव बनून भक्तजनांची मनोकामना पूर्ण करण्याचे तसेच या अविनाशी रुद्र ज्ञानयज्ञाचे पूर्णतः रक्षण करण्याचे. अशा या कल्याणकारी महान व्रतांना तुम्ही मोहाचा कलंक लावून व्रतभंग करणार आहात काय? हा व्रतभंग आत्म्याचे अकल्याण करणारा आहे. तुमच्या संपूर्ण झालेल्या आत्मस्थितीला तडा देणारा आहे, सत्ययुगा-पासून आत्म्याचा संपर्क कल्पकल्पांतरासाठी तोडणारा आहे. **या व्रतांचे पालन करण्याऐवजी शेवटपर्यंत केवळ मोहजीत बनण्यासाठी युद्धच करीत राहिलो तर आत्म्याची गती काय होईल, हे समस्त ब्रह्मावत्स चांगल्या प्रकारे जाणततच. बंधुंनो, मोह हे रावणाचेच एक मुख नव्हे काय? त्याची अन्य मुखे छाटली परंतु हे एक मुख साधक छाटू शकला नाही तर तो श्रीलक्ष्मीनारायणाची सात्विक व तेजपुंज मुखमंडले पाहू शकेल काय?** तुम्ही रुहानी योद्धे आहात. युद्ध करीत असताना तुमच्या हातात शिवबाबांचा ध्वज आहे हे कधीही विसरू नका. त्या दैहिक युद्धात असे काही ऐतिहासिक शूरवीर होऊन गेले आहेत की जे प्राण जात असतानाही आपल्या हातातील ध्वज खाली पडू न देता दुसऱ्याच्या हाती सोपवून मगच प्राण सोडतात अर्थात त्यांचे धैर्य मृत्युच्या वेळीही गळून पडत नाही. मराठा सरदार दत्ताजी शिंदे यांची अशी एक वीरगाथा आहे की मोगलांशी

युद्ध करीत असताना ते जखमी होऊन आपल्या मायभूमीवर कोसळले. त्याक्षणी शत्रूपक्षातील मोगल सरदाराने त्याच्या छातीवर तलवार ठेऊन विचारले, 'बोलो दत्ताजी, क्या अब भी लडेंगे?' त्या मरणप्राय स्थितीतही धैर्यवत होऊन दत्ताजी शिंदे उद्‌गारला, 'बचेंगे तो और भी लडेंगे।' बंधुनो, अशा-प्रकारचे धैर्य मायेशी युद्ध करतानाही आवश्यक आहे. या युद्धातील हार म्हणजे प्रत्यक्ष भगवंताचा सर्वोच्च ध्वज खाली टाकण्यासारखे आहे. म्हणून मृत्युची वेळ आली तरी मोहवश न होता परमात्म स्मृतीचा व श्रीमताचा ध्वज मी खाली पडू देणार नाही हा दृढ निश्चय रूहानी योद्धयांनीही करावयास हवा. या निश्चयातच तुमचा विजय आहे कारण स्वतः परमात्म्याने तुम्हाला वरदान दिले आहे, 'निश्चयबुद्धी विजयन्ति।'

**ज्यांनी गीताज्ञान आपल्या कर्मातून प्रत्यक्ष केले त्या पिताश्री ब्रह्माबाबांची महिमा असलेले गीत आहे की, 'भारतकी भूमीपर एक दिव्य पुरुषने जन्म लिया।' याच गीतात त्यांनी केलेल्या महान पुरुषार्थाविषयी एक ओळ आहे की, नष्टोमोहः स्मृतिर्लब्धा बन, गीता ज्ञान साकार किया।' नष्टोमोहः तसे स्मृतिस्वरूप बनण्यात ब्रह्माबाबांच्या बरोबरीने मम्मांनीही सर्वात मोठी बाजी मारली आहे.** म्हणून तर ते सत्ययुगात नंबर १ लक्ष्मी-नारायण बनणार आहेत. अर्थात त्यांचाच आदर्श ब्रह्मावत्सांना ठेवावयाचा असल्याने मधुबन-मध्ये हा प्रश्न नेहमीच विचारला जातो की श्रीलक्ष्मीनारायण कोण बनणार आहेत? त्यावेळी समस्त ब्रह्मावत्स आपला हात वर करतात. परंतु हाच प्रश्न श्रीसीतारामाविषयी विचारल्यावर मात्र कोणीही हात वर करीत नाहीत. जर तुम्ही लक्ष्मीनारायण अथवा श्रीलक्ष्मीनारायणासम पद प्राप्त करण्यासाठी हात वर केला आहे तर त्याप्रमाणे पुरुषार्थातही तशी लक्षणे दिसावयास हवीत. **अर्थात मोहन बनायचे असेल तर निर्मोही बनणे आवश्यक आहे. निर्मोही बनण्यात तुमचा २१ जन्मांसाठी फायदाच फायदा आहे** याउलट मोह ठेवल्याने मनुष्यआत्म्याचा कोणताही फायदा न होता नुकसान मात्र नक्कीच होते. तुम्ही कोणत्याही देहधाऱ्यात मोह ठेवा अथवा ठेवू नका परंतु ज्यावेळी त्या व्यक्तीचा मृत्यु होणार आहे त्यावेळी तो निश्चितपणे होणारच आहे. एक सेकंदही मागेपुढे होणार नाही. ड्राम्याचे हे गुह्यज्ञान प्राप्त करूनही तुमची मोहमुक्त स्थिती बनत नसेल तर असे समजावे की ड्राम्याच्या या ज्ञानाचा तुम्ही मनापासून स्विकार केलेला नाही. या अस्विकृतीमुळेच तुमच्या मनात अनेक संकल्प निर्माण होतात. असे व्हायला नको होते. माझ्याच नशीबी इतके कर्मभोग का? माझा ड्रामा तर अनेक समस्यांनी भरलेला आहे. माझे नातेसंबंधी मला केवळ दुःखच देत आहेत आणि जी व्यक्ती मला सुख देणारी होती ती तर देह सोडून गेली. विचार करा, ज्या प्रिय व्यक्तीवर तुम्ही नितांत प्रेम करीत होता त्या व्यक्तीचे वारंवार स्मरण केल्याने तुम्हास दुःख होत आहे अर्थात मृत्युनंतर ती व्यक्ती अप्रत्यक्षपणे तुम्हाला दुःख देण्यासाठी निमित्त बनत आहे. अशाप्रकारे 'ना दुःख दो ना दुःख लो' या अमूल्य घोषवाक्याचा संबंध मृत्युनंतरही आहे असे म्हणावे लागेल. या दिलेल्या अप्रत्यक्ष दुःखामुळेही तुमचे आत्मिक पतन होऊन सत्ययुगात पदावनती होण्यास व सत्ययुगाचे काही वर्षांचे प्रारब्ध नष्ट होण्यासाठी ती प्रिय व्यक्ती कारणीभूत होणार आहे. आश्चर्य तर हेच आहे की ज्या आत्म्याने आयुष्यभर तुमच्याविषयी सदा कल्याणाची भावना ठेवली होती परंतु तोच आत्मा त्याच्या देहाच्या मृत्युनंतर मात्र तुमच्या अकल्याणार्थ निमित्त बनतो. **आता शांतपणे विचार करा केवळ एका मोहामुळे दोन आत्म्यांचे किती अकल्याण होऊ शकते? हा खतरनाक मोहच देहाभिमान निर्माण करून पुरुषार्थी जीवनात फार मोठी बाधा निर्माण करतो. मोहामुळे निर्माण होणाऱ्या दुःखावर परमात्म ज्ञान व राजयोग हा अंतिम उपाय आहे.** सकारात्मक मनन, चिंतन करून तुम्हीच तुमच्या मनाला उत्तमप्रकारे समजावू शकता. आपल्या सर्वांसमोर संगम-युगावरील हा फार मोठा प्रश्न आहे की कल्पकल्पांची ही बाजी हरावयाची की जिंकावयाची? अर्थात आपल्या शब्द-कोशात हरणे हा उदासीन शब्दच नाही. आपण समस्त ब्रह्मावत्स कल्पकल्पांचे विजयी आत्मे आहोत. मोहमायेवरील विजय हा विश्वातील सर्वात महान विजय आहे. 'विजयी भव'चे वरदान स्वयं परमात्म्याने आपल्याला दिले आहे. आपली हार होणे पूर्णतः असंभव आहे. **आता आपल्या सर्वांच्या अंतर्आत्म्यातून एकच शब्द बाहेर पडेल तो म्हणजे विजय, विजय आणि केवळ विजय. विजय आपला कल्प-**

**कल्पांचा जन्मसिद्ध अधिकार आहे. या महान विजयापासून कोणी दूर जात असेल तर त्याला महाभारत या मालिकेतील श्रीकृष्णाप्रमाणे सांगावेसे वाटते की, 'हे पार्थ, स्वयं परमात्म्याने केवल एक दो जन्म नही परंतु २१ जन्मों के लिए दैवी राज्यभाग्य का स्वर्गीय द्वार खोला है।** पार्थ, महाविनाश के लिए तो अल्पकालही बाकी रहा हुआ है और अब भी तुम इस मोह की शृंखलामे अटके हुए हो? तोड दो वह मायामोह की शृंखला और अपने आपको स्वतंत्र करो। इस स्वतंत्रता के आधारपर ही तुम्हे दैवी स्वातंत्र्य का सुख-दायी संसार प्राप्त होनेवाला है। पार्थ, इस असार संसारमे कोई सार नही रहा है। अर्थात यह संसार तुम्हारे लायक रहा ही नही। अतः विस्मृत कर दो यह पुराना संसार, पुराना देह और पुराने देहके संबंधी। यदि तुम्हारा तमोप्रधान शरीरसे लगाव है तो स्वर्णिम युगमे तुम्हे देवताओंका सतोप्रधान शरीर कैसे प्राप्त होगा? कलियुगी मनुष्यने भी इस संसार के लिए कहा है झुठी माया, झुठी काया, झुठा है सब संसार। हे प्रिय अनुज, तुम्हे इसी संसारमे रहते हुअे सुख शांतिका सर्वोत्तम संसार निर्माण करना है। अतः अपने आपको सँवारो पार्थ, अपने आपको सँवारो।'

**सुखशांतीचे विश्व निर्माण करावयाचे असेल तर आत्म्यातील दुःख, अशांती समूळ व सदाकाळ नष्ट झाली पाहिजे. दुःखाचे मूळ मोहात आहे तर मोहाचे मूळ देहाभिमानात आहे. म्हणून सर्व प्रथम आत्माभिमानी होण्याचा पुरुषार्थ करणे आवश्यक आहे. आत्माभिमानी त्यालाच म्हणावयाचे जो अल्पकाळच्या दैहिक नात्याला जाणत असतानाही आत्मा आत्म्यातील बंधुत्वाच्या अनादि नात्याची त्याला कधीही विस्मृती होत नाही.** एक विशाल दृष्टिकोन त्याच्या आंतर्चक्षुत निर्माण झालेला असतो. आपल्या लौकिक परिवाराविषयी असलेला मोह नष्ट होण्यासाठी अशा विशाल दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. त्यासाठी चिंतन करावे की चार भिंतीतील सीमित परिवार हा केवळ माझा परिवार नाही. परंतु हे विश्वची माझे घर हा व्यापक दृष्टिकोन मनात निर्माण व्हायला हवा. वास्तविक आपण सर्व आत्मे मुक्तीच्या अवस्थेत एकाच परमधाममध्ये होतो. तेथे पती-पत्नी, आई-वडील, भाऊ-बहिण, काका-मामा, मावशी-आत्या अशी कोणतीही नाती नव्हती केवळ एक परमात्मा पिता व सर्व विदेही आत्मे त्याची संतान. अर्थात त्या निराकार सृष्टीत आपल्या सर्वांमध्ये केवळ बंधुत्वाचे नाते होते. परंतु या साकार सृष्टीवर आल्यानंतर मातेच्या गर्भातून स्त्री अथवा पुरुषाचे शरीर धारण करून भिन्न-भिन्न पार्ट बजाविताना ही दैहिक नाती निर्माण झाली.

वास्तविक येथेही आपण आत्मस्वरूपात एकाच परमात्म्याची संतान भाऊ-भाऊ आहोत. हे केवळ ब्रह्माकुमारी विद्यालया-तील ज्ञानी आत्मेच जाणू शकतात. तसेच ज्ञानी व अज्ञानी स्त्री, पुरुषही ब्रह्माची अलौकिक संतान बंधु-भगिनी आहेत. प्रत्येकाने असा विचार करावयास हवा की, माझ्या सीमित कुटुंबातील मुले देखील त्या शिवपित्याची संतान असल्याने आत्मस्वरूपात तेही माझे बंधु आहेत. इतकेच नव्हे तर आजोबा व नातवंडे यांच्यामधील नातेही बंधुत्वाचे आहे. (सूचना - हा मनातील गुप्त पुरुषार्थ असल्याने दैहिक नात्यात तू माझा अमुक नसून भाऊ आहेस असे म्हणणे अयोग्य होईल, अर्थात सामाजिक मर्यादांचे भान अवश्य ठेवावे.) हे आत्मिक बंधुत्वाचे नाते मनात इतके पक्के रुजले पाहिजे की, हजारो मैल दूर असलेल्या एखाद्या कुटुंबातील स्त्री, पुरुष व माझ्या कुटुंबातील स्त्री, पुरुष यांच्यामध्ये मला कोणतीही भिन्नता वाटता कामा नये. **आत्मा-आत्म्यातील भिन्न-भिन्न संबंध व कर्मबंधनामुळे भिन्न-भिन्न कुटुंबे निर्माण झाली आहेत. अर्थात ही कौटुंबिक भिन्नता आपल्या सर्व आत्म्यांच्या मूळ निवासस्थानात म्हणजे परमधाममध्ये नव्हती. ज्याप्रमाणे मज आत्म्याचा पिता सर्व आत्म्यांकडे ज्या दृष्टिकोनातून पाहतो तोच दृष्टिकोन पुत्राचाही असणे आवश्यक आहे. अर्थात त्यासाठी आत्मिक दृष्टीचा अभ्यास करणे अपरिहार्य आहे.** या महत्वपूर्ण अभ्यासाने आपली वृत्तीच आत्मिक दृष्टीची झाली तर कोणत्याही संबंधात अंशमात्रही मोह राहणार नाही. विनाशी शरीरात मोह असू शकतो परंतु अनादि अविनाशी आत्म्याविषयी मोह असू शकेल काय? जेथे केवळ शुद्ध आत्मिक प्रेम असू शकते तेथे दुःखाचा लवलेशही नसतो अर्थात आत्मिक प्रेम सदा सुखदायी असते. अशाप्रकारे सखोल चिंतन करून मनबुद्धीने सिमित असलेल्या सर्व भिंती पाडून 'वसुधैव कुटुंबकम्' ची असीम

दृष्टी ठेवल्यास तुम्ही मायाजीत व विश्वजीत बनून नवविश्वाचे स्वर्गीय राज्यभाग्य प्राप्त करू शकाल.

बंधुंनो, मोह हा मानवी मनातील फार मोठा अंधःकार आहे. हा अंधःकार अंतापर्यंत तसाच राहिला तर साधक सत्ययुगी सुवर्ण प्रभातीचा नवप्रकाश पाहू शकणार नाही. दीर्घकाल मोहापासून दूर असणाऱ्या महारथींनाही मोह मोक्याच्या अंतिम क्षणी धोका देऊ शकतो. अर्थात त्यांच्या संपन्न स्थितीला तडा जाऊ शकतो. विचार करा, महाविनाशाच्या वेळी भूकंप होऊन अनेक धरणे फुटल्याने महापूर येईल व त्या महापूरात ओमशांती हॉलच्या बाहेर लावलेल्या चित्राप्रमाणे स्त्री, पुरुष व लहान मोठी मुलेही वाहत जाताना दिसतील. सर्व दिशांनी केवळ आक्रोशाचे आवाज येतील. भिन्न भिन्न प्राकृतिक आपदांमुळे लाखो मनुष्यांचे मृत्यु होऊन मृत देहांचा अक्षरशः खच पहावा लागेल. त्यावेळी अत्यल्प काळासाठी जिवंत राहिलेल्या सर्वसामान्य मनुष्याची नव्हे तर भल्याभल्यांची मानसिक अवस्था अतीव दुःख व भीतीदायक आश्चर्याने उध्वस्त होईल आणि ही दुःखद अवस्था अंतिम समयी झाली तर आत्म्याची सद्‌गती सुखदायी विश्वात होऊ शकेल काय? **बंधुंनो, महाविनाश ही काही ठराविक आत्म्यांसाठी परीक्षा नाही तर संपूर्ण मनुष्य सृष्टीसाठी महापरीक्षा असेल. या महापरीक्षेत निर्भय राहून पास होणारे आत्मे अत्यंत धैर्यवान, मृत्युंजय व महान योगी आत्मे असतील.** अशाप्रकारे जे वास्तविक महारथी आहेत ज्यांनी महाविनाशाच्या महाभयंकर परिस्थितीला कसे तोंड द्यावयाचे आहे याचे प्लॅनिंग केले आहे, ज्यांची स्थिति दीर्घकाळाच्या योगाने व पुरुषार्थाने शक्तिशाली झाली आहे अशा पहाडासमान अचल स्थितीला प्रकृतीचेच नव्हे तर मृत्युचे थैमानही हलवू शकणार नाही. अर्थात त्यांची आत्मज्योत कोणत्याही तुफानाने विझू शकणार नाही. बंधुनो, हीच ती कहाणी असेल 'तुफान और दीये की!' त्या तुफानातही त्यांच्या मनात हेच संकल्प येतील की ड्राम्याचा हा अंतिम सीन अथवा मनुष्य सृष्टीचा अंतिम खेळ आहे. हा खेळ याचसाठी चालला आहे की सर्व आत्म्यांनी आपल्या मूळ स्वरूपात व मूळ स्थानी प्रस्थान करावे. महाविनाशातील सर्वांचा शारीरिक मृत्यु दृश्य स्वरूपात अत्यंत दुःखद, भयावह व विदारक वाटेल. परंतु हा अंतिम मृत्यु समस्त मानवमात्रासाठी मंगलदायी व कल्याणकारी असेल. केवळ महाविनाशानंतरच मनुष्यसृष्टीचे सुखदायी व सर्वोत्तम व्यवस्थापन होऊ शकते. मायेमुळेच मनुष्य सृष्टीचे व्यवस्थापन बिघडत जाते. तब्बल २५०० वर्षे मानवमात्राला दुःखी अशांत व पतित करणाऱ्या मायेचाही या महाविनाशात विनाश होताच प्रथमतः मुक्तीचे द्वार तात्काळ उघडेल. तर अल्पकाळातच जीवनमुक्तीचे अर्थात मायेचा अंशमात्रही स्पर्श नसलेल्या सर्वांग सुंदर अशा सत्ययुगी स्वर्गाचे सुवर्णद्वारही उघडेल. या द्वारातून प्रथमतः प्रवेश करणाऱ्या आत्म्यांना २५०० वर्षांची जीवनमुक्ती प्राप्त होईल. **त्यासाठी प्रत्येक ब्रह्मावत्साने हा दृढ निश्चय करावा की विकर्माजीत संवत १-१-१ पासूनची सत्ययुगी जीवनमुक्ती माझा जन्मसिद्ध अधिकार आहे. अर्थात मी आत्मा परमात्म्याचे विजयी रत्न असल्याने कल्पकल्पांच्या या खेळात मज आत्म्याचा मायेवरील विजय निश्चित आहे. मायाजीत होऊनच स्वपित्यासमवेत मला स्वगृही जायचे आहे.** पाच युगांच्या व पाच हजार वर्षांच्या या नाटकात भिन्न-भिन्न पार्ट बजाविण्यासाठी ज्या स्थानाहून आलो होतो त्याच विश्रामस्थानी पुनर्प्रस्थान करावयाचे आहे. अशा या बेहदच्या विश्रामस्थानी ना देह, ना देहाची चिंता, ना देहाची दुनिया, ना कुणाविषयी मोह ममता, ना कसली स्मृती, ना विकल्प संकल्प, ना सुख ना दुःख हीच ती आत्म्याची निजधामातील वास्तविक विश्रांती होय. भविष्यात आत्म्याला साकार सृष्टीवरून महाप्रवास करावयाचा असल्याने सक्तीच्या विश्रांतीचे हे अनादि व्यवस्थापन असावे. या विश्रांती स्थानात हे आपोआपच निश्चित होते की, आत्मा आपला प्रथम जन्म कोणत्या युगांत, कोणत्या देशात व कोणत्या धर्मात कशाप्रकारचा घेणार आहे? जो आत्मा संगमयुगावर सर्वात प्रतिकूल परिस्थितीत सर्वात चांगली स्थिती ठेवेल तो सर्वात श्रेष्ठ असलेल्या युगात व सर्वात श्रेष्ठ असलेल्या आत्म्यांच्या समवेत दैवी कुळात आपला प्रथम जन्म प्राप्त करेल. असा सर्वोत्तम जन्म प्राप्त होण्यासाठी संगमयुगावर कोणत्याही देहधाऱ्याविषयी अंशमात्रही मोह राहता कामा नये.

▶ पान क्र. २८ वर

# व्यक्तिगत वा सामुहिक जीवनातील सर्व समस्यांचे मूळ कारण सहनशक्तीची कमी

*ब्र.कु.चंद्रशेखर, आबू रोड.*

वर्तमानसमयी ब्रह्मावत्सात सहनशक्तीची कमी असल्याने सर्व गोष्टी होताना दिसतात. मग ती गोष्ट अभिमानाची असो, अपमानाची असो, व्यर्थ संकल्पांना कारणीभूत असो, या सर्वांचे कारण सहनशक्तीची कमी हेच आहे. कोणी दुसरा असा वागला म्हणून मी असे वागलो, कोणी रागावला म्हणून मी देखील रागावलो. समोरची व्यक्ती चूक करताना पाहून मला त्याचा राग आला अशा अनेक सबबी सांगून आपण स्वतःची सुटका करून घेतो. दुसऱ्यांना लगेचच दोषी ठरवून आपण कसे बरोबर आहोत याचे स्पष्टीकरण देतो. परंतु आपली स्वतःची चूक कोणती, याचा विचार मात्र करत नाही. दोघांमध्ये जर वादविवाद होत असेल, अशावेळी एकाने जरी सहनशक्ती धारण केली तर ती गोष्ट त्याक्षणी समाप्त होऊन जाईल. त्यामुळे कधीही दुसऱ्याची काय चुक होत आहे याचा विचार न करता आपले स्वतःचे काय चुकले याचा विचार करा. लक्षपूर्वक स्वतःचे चेकिंग करा. त्याचबरोबर सहनशक्ती धारण करा. त्यामुळे आपण सहजच अंतर्मुखी राहू. फलस्वरूप आपल्यात शांतीची शक्ती येईल आणि तिच्याबरोबर सर्व शक्ती आपोआपच येतील. तसेच अन्य सर्व गोष्टी समाप्त होतील, फलस्वरूप आपण बापसमान बनू.

**❒ साक्षी स्थितीत राहण्यासाठी सहनशीलतेची आवश्यकता**

साक्षी स्थिती जीवनातील सर्वश्रेष्ठ स्थिती आहे जिच्याकडे सर्व महापुरुषांनी लक्ष वेधले आहे. साक्षी स्थितीत राहण्याचा उपदेश दिला आहे. परंतु सदाकाळची साक्षी स्थिती मात्र ते बनवू शकले नाहीत कारण विश्वनाटकाचे यथार्थ ज्ञान त्यांच्याजवळ नव्हते. आता स्वयं शिवबाबांनी आपल्याला विश्वनाटकाचे ज्ञान दिले आहे. कर्माच्या विधी-विधानाचे ज्ञान दिले आहे. याच्या आधारेच साक्षी स्थिती बनते. त्यासाठी शिवबाबांनी श्रीमत दिले आहे की जेव्हा तुम्ही या विश्वनाटकात साक्षी होऊन पाहाल तेव्हाच त्याचे यथार्थ सुख अनुभव करू शकाल. सहनशील मनुष्यच साक्षी बनू शकतो व ड्रामाची ढाल पकडू शकतो.' जो सहनशील नाही तो ड्रामाची ढाल पकडू शकत नाही. तात्पर्य म्हणजे साक्षी स्थितीत राहण्यासाठी सहनशीलता अति आवश्यक आहे. जितके आपण साक्षी स्थितीत राहू तितकेच साक्षात्कार मूर्त व साक्षात मूर्त बनू. त्याचबरोबर जितका वेळ साक्षी स्थितीत राहू तितका वेळ शिवबाबा, जो आपला साथी आहे त्याची आठवण राहील.

जितके आपण स्वतःला शरीरापासून न्यारे (अलिप्त) अशरीरी आत्मा समजू तितकी साक्षीपनची अवस्था, शक्ती भरण्याचे काम करते. ज्याप्रमाणे एखाद्या कमजोर व्यक्तीला शक्ती भरण्यासाठी ग्लुकोज चढवले जाते त्याप्रमाणे साक्षी अवस्था काम करते. त्यामुळे हा अभ्यास करा की केवळ कर्म करण्यासाठी शरीराचा आधार घ्या व कर्म संपताच शरीरापासून न्यारे बना. हा अभ्यास निरंतर केल्याने आपण साकारी तन व पुरानी दुनिया यांच्यापासून उपराम होऊ. फलस्वरूप आपल्याला असा अनुभव होईल की आपण साक्षी होऊन या दुनियेतील खेळ पाहत आहोत. प्रत्येक आत्मा आपला-आपला पार्ट बजावत आहे. तो केवळ साक्षी होऊन पाहत राहा. संपूर्ण नाटक साक्षी होऊन पहायचे आहे तसेच आपली भूमिका देखील बजावायची आहे. शिवबाबा समजावून सांगतात की तुम्ही जे काही बघत आहात ते सर्व विनाशी आहे. तुम्हाला तर आता घरी जायचे आहे. या दुनियेतील सुख हे काग-विष्टा समान आहे.

मुळातच हा व्हरायटी ड्रामा आहे अर्थात विविधतेने नटलेला आहे. मग त्यातील विविध स्वभाव-संस्कार, विविध परिस्थिती पाहून विचलित व्हायची काय गरज आहे? त्यामुळे साक्षी स्थितीत स्थित होऊन, प्रत्येक आत्म्याचा पार्ट बघत राहा म्हणजे सदैव हर्षित राहाल. सर्व काही साक्षी होऊन पाहा कारण तुम्ही आता ड्रामा पूर्णपणे जाणता. त्यामुळे तुम्ही कधीही भूत आणि भविष्याचा विचार देखील करता कामा नये. केवळ शिवबाबांची आठवण करत राहा

व सर्वांना शिवसंदेश (बाबांचा परिचय) देत राहा.

**❒ सहनशक्तीद्वारेच स्वपरिवर्तन व विश्वपरिवर्तन शक्य**

ज्यामध्ये सहनशक्तीची कमी आहे, तो स्वपरिवर्तनाचा अंतिम टप्पा गाठू शकत नाही कारण बापसमान निराकारी, निर्विकारी व निरहंकारी स्थिती मधील अंतिम टप्पा आहे निरहंकारिता. ज्यात हा गुण आहे तोच सहन करू शकतो. त्याचबरोबर ज्यात अहंकार आहे, तो कुठलीही गोष्ट सहन करू शकत नाही. तात्पर्य म्हणजे सहनशक्ती धारण केल्यानेच आपण निरहंकारी बनू शकतो. हीच स्वपरिवर्तनाची वास्तविक अंतिम निशाणी आहे व अशी व्यक्ती विश्व-परिवर्तनासाठी देखील निमित्त बनू शकते. म्हणूनच म्हटले जाते, टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही.

पिताश्री ब्रह्माबाबांचे उदाहरण आपल्यासमोर आहे. त्यांच्या जीवनात किती समस्या आल्या, किती लोकांनी त्यांचा अपमान केला त्यांच्याविरूद्ध 'अँटी ओम् मंडळी' (*Anti Om Mandli*) ही संस्था स्थापन झाली. अज्ञान-काळात जे त्यांचे प्रशंसक होते तेच त्यांचे निंदक बनले. तरीही सर्व विरोध ब्रह्माबाबांनी हसत-हसत सहन केला. विरोधकांविषयी देखील शुभभावना मनात बाळगली. फलस्वरूप कालानुरूप विरोधक बदलले व त्यांना ईश्वरी कार्याचे तसेच पिताश्रींचे महत्व लक्षात आले. तात्पर्य म्हणजे सहनशक्तीचे कवच धारण केले तर कुठलीही व्यक्ती वा परिस्थितीचा प्रभाव आपल्यावर होत नाही. त्यामुळे सहनशक्ती धारण करा. आपण जेव्हा शिवबाबांनी सहन करण्याची आज्ञा दिली आहे हे लक्षात ठेऊन मोठ्या प्रेमाने प्रत्येक गोष्ट सहन करतो अर्थात स्वतःमध्ये परिवर्तन करतो तेव्हा आपल्यात सर्व शक्ती आपोआप येतात व आपली स्थिती सदैव अचल, अडोल व एकरस रहाते. तसेच आपल्या अंगी देवपण येत जाते. ❖❖❖

*● केवळ दोन शब्द पतनासाठी तसेच उत्थानासाठी कारणीभूत आहेत - 'मी व माझे'. त्यामुळे जेव्हाही 'मी' शब्द आपण बोलतो तेव्हा कुठला ना कुठला स्वमान बुद्धीत आणा. तसेच 'माझे' शब्द बोलता तेव्हा 'माझे शिवबाबा' स्मृतीत आणा.*

## असे हे संगमयुगी वारसदार

मजला पुत्र मानूनी वारीस बनवा वदले आपुले शिवपिता
म्हणूनी त्याजला पुत्र मानूनी बनावे त्याचे मातपिता ।। १ ।।
बंधुभगिनींनो, शिवबाबाला पुत्र मानण्यात संकोच नसावा
त्याचे मातपिता होऊनी विश्वातील सर्वोच्च आनंद प्राप्त करावा ।।
शिवबाबा जरी असेल माझा गुजगोष्टी करणारा परममित्र
तरी तो आता माझा झाला आहे भरवशाचा प्रामाणिक पुत्र ।।
प्रत्येक प्रतिकूल परिस्थितीत लौकिक पुत्र उपस्थित नसतो
संकल्प करता क्षणी शिवपुत्र हा वायुवेगाने उपस्थित होतो ।।
दैहिक समस्येचे निवारण करण्या दैहिक पुत्राशी बोलावे
आत्मिक समस्येवर मात्र आत्मिक पुत्राशी रुहरिहान करावे ।।५ ।।
लौकिक पुत्राची प्रकृती कधी-कधी होत असते नादुरुस्त
पारलौकिक पुत्र माझा सदा असतो निरोगी व तंदुरुस्त ।।
लौकिक पुत्र परगावी गेला असता पाठवित नाही एकही पत्र
पारलौकिक पुत्र तो प्रतिदिनी पाठवितो एक ज्ञानयुक्त पत्र ।।
नित्य नवनवीन वस्तु घेण्याचा लौकिक पुत्राचा असतो हट्ट
पारलौकिक पुत्राचा हा एकची हट्ट, ठेवा स्मृति माझी घट्ट ।।
लौकिक पुत्र देश सोडून गेला तर म्हणतो 'मी आहे परदेशात'
शिवपुत्र हा देश सोडून गेला असता म्हणतो 'मी आहे स्वदेशात' ।।
लौकिक पुत्र भारतभूमीला उद्देशून वदतो वंदे मातरम्
पारलौकिक पुत्र शिवशक्तींना आदराने वदतो वंदे मातरम् ।।१० ।।
लौकिक पुत्र करवितो सफर भिन्न-भिन्न प्रेक्षणीय स्थळांची
पारलौकिक पुत्र तो सफर करवितो विश्वासहित तीन लोकांची ।।
लौकिक पुत्र मजसाठी आणितो भिन्न-भिन्न प्रकारची वस्त्रे
पारलौकिक पुत्र मजला देतो वीस जन्मांची पवित्र देहवस्त्रे ।।
सर्व पुत्रात माझा शिवपुत्र आहे सर्वाधिक स्नेही, कर्तृत्ववान
कलियुगी नर्क उध्वस्त करूनी तो स्थापितो स्वर्ग महान ।।
कधी शिवबाबा माझे संतान तर कधी मी संतान शिवबाबांचे
भावस्पर्शी हे विचित्र नाते, सार्थक जाहले अलौकिक जन्माचे ।।
स्वामी तिन्ही जगाचा पण अनुभव नसे मातपित्याच्या प्रेमाचा
आता आपणच त्याचे मातपिता होऊनी वर्षाव करूया वात्सल्याचा ।।१५ ।।
जर तुम्हासी नको असेल अलौकिक वारसाहक्कात थोडाही घाटा
तर आपुल्या लौकिक संपत्तीतही ठेवा, शिवपुत्राचा वाटा ।।
आत्म्याच्या प्रत्येक क्रियेवर प्रतिक्रिया निर्माण होत असते
म्हणूनी शिवबाबालाच आपला वारसपुत्र मानावयाचे असते ।।
असे हे वारसदार असतात केवळ या पावन संगमयुगावरी
वारसा हक्काचे असे हे आदान-प्रदान कोठेची नाही भूवरी ।।

***ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे.***

# तणावमुक्त जीवन जगण्यासाठी १८ सोनेरी सिद्धांत

१) **तनाच्या भानामुळे (देहअभिमानामुळे) तणावाचे आवाहन (तन+आव) केले जाते. त्यामुळे या सृष्टीरूपी रंगमंचावर पार्ट बजावतांना स्वतःला देहापासून भिन्न अविनाशी आत्मा समजा. स्वतःला हिरो ॲक्टर समजून अगदी निर्भय बनून आपली भूमिका बजावा तसेच दुसऱ्यांचा अभिनय पाहून देखील खुश राहा.** २) तणाव ही एक प्रकारे धोक्याची सूचना देणारी घंटी आहे असे समजून त्याचे विश्लेषण करा व स्वतःला परिवर्तीत करा. ३) पवित्रतेचे सागर परमात्मा शिवबाबांशी मन लावा. विश्वस्त (ट्रस्टी) बनून कार्य करा व कर्मयोगी जीवनाचा आनंद अनुभवा.

४) समस्या ही उन्नतीची शिडी आहे असे समजून परमात्मा पित्याला आपला सोबती (साथी) बनवा. सदैव सकारात्मक दृष्टिकोन बाळगा. कर्माची गुह्यगती जाणून श्रेष्ठ कर्म करा.

५) क्रोध, ईर्ष्या, द्वेष व बदल्याची भावना यापासून मुक्त होण्यासाठी आत्मिक स्वधर्म शांती, प्रेम, आनंद, शक्ती यांची अनुभूती करा व जीवनाची दोर आपल्या हातात ठेवा.

**६) संयमित जीवन जगा. रोज पुरेशी झोप घ्या. अंतर्आत्म्याचा आवाज ऐका कारण तोच आपला खरा मित्र आहे. संयमित जीवनशैलीमुळे जीवनात उमंग-उत्साह टिकून राहतो. सात्विक शाकाहारी भोजन, नियमित पायी फिरणे, सुर्योदयापूर्वी उठणे, यामुळे तन व मन दोन्ही प्रफुल्लीत राहतात.**

७) निःस्वार्थ व निरपेक्ष भावनेने तसेच निर्मळ मनाने सेवा करा.

८) समय एक अमूल्य खजिना आहे. त्यामुळे वर्तमान समय सफल करा कारण पुरुषोत्तम संगमयुगातील एक-एक सेकंद पद्मांची कमाई करवणारा आहे.

९) भूतकाळाला विसरून वर्तमान सफल करा. स्वमानात स्थित होऊन सकारात्मक संकल्पांच्या खजिन्यांनी आध्यात्मिक बुद्धी (SQ) वाढवा.

१०) सर्वशक्तिवान परमात्माच्या छत्रछायेत राहून, शक्तिशाली स्थितीचा अनुभव करा.

११) संगमयुगात आपल्याला झालेल्या अपार प्राप्तींच्या स्मृतीत राहून सदैव हर्षित राहा. तसेच दुसऱ्यांनाही आपल्या दृष्टी-वृत्ती द्वारे खुशीचा उपहार प्रदान करा म्हणजे आपले जीवन खुशींनी भरून जाईल.

१२) क्षमा करणे ही महानतेची निशाणी आहे. त्यामुळे क्षमा करा व विसरून जा.

१३) जीवनात सरलता धारण करा आणि कुसंगापासून दूर राहा म्हणजे परिस्थिती आपोआपच सरळ होत जाईल.

१४) आध्यात्मिक ज्ञानाच्या धारणेला आपल्या जीवनाचे लक्ष्य बनवा. १५) मी आत्मा या सृष्टीरूपी रंगमंचावर सहनशील, दयाळू व हिरो पार्टधारी आहे, असे समजा.

१६) स्वतःची तुलना दुसऱ्यांशी करू नका. स्वतःला दैवी गुणांनी संपन्न विशेष आत्मा समजा.

१७) दानी-वरदानी बना. आपल्या मन, वचन, कर्माद्वारे सर्वांना सुख-शांतीचा अनुभव करवा.

**१८) आपल्या सर्व समस्या परमात्मा पित्याला अर्पण करा व त्याची प्रेमपूर्वक आठवण करा म्हणजे सर्व समस्यांचे समाधान होईल. सदैव हर्षितमुख व प्रसन्न राहून बेफिकर बादशहा बना.**

## ❒ तणावमुक्त होण्यासाठी नकारात्मक संकल्पांना सकारात्मक बनविण्याची विधी

सर्वप्रथम साक्षी होऊन आपल्या मनातील नकारात्मक विचारांना पाहा. त्यांना हळूहळू सकारात्मक दिशा द्या. स्वतःला देहापासून भिन्न आत्मा समजून स्वधर्मात (शांती, पवित्रता, प्रेम, सुख, आनंद, ज्ञान व शक्ती) स्थित व्हा व प्रेमपूर्वक ज्ञानसूर्य परमात्म्याची आठवण करा. तरीसुद्धा अधून-मधून नकारात्मक संकल्प मनात येत असतील तर त्यांना बुद्धीरूपी लगाम लावून थांबवा. त्यांना थांबण्याची आज्ञा द्या. पुन्हा संकल्पांना सकारात्मक बनवा. परिणामतः हळूहळू नकारात्मक संकल्प समाप्त होत जातील. **ज्याप्रमाणे एखाद्या लहान मुलाच्या हातात चुकून चाकू आला तर तो त्याने लगेच सोडावा यासाठी त्याला एखादे सुंदर खेळणे दिले जाते. त्याप्रमाणे मनाला सकारात्मक संकल्परूपी खेळणे दिले म्हणजे जीवनातील नकारात्मकता (तणाव, उदासीनता, डिप्रेशन) आपोआप दूर होईल. (संदर्भ : ब्र.कु.डॉ.पुष्पा पांडे लिखित 'श्रीमद्‌भगवद् गीता का सत्य सार')**



# राजयोग-जीवन जगण्याची कला

(अनुभव) -- *ब्र.कु.अनिल विधाते, बालमटाकळी (शेवगांव).*

साधारण १२ वर्षापूर्वी मी माझ्या मित्रांसोबत सहकुटुंब माउंट आबू (राजस्थान) येथे फिरायला गेलो होतो. परंतु सृष्टीरूपी नाटकात कोणाच्या नशिबात काय असेल, हे कुणाला सांगता येत नाही. मराठीत एक गीत आहे, 'खेळ कुणाला दैवाचा कळला'. या गीताप्रमाणे माझ्या जीवनात घडत गेले. माउंट आबूला गेल्यावर आम्ही सर्वांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालय बघितले. ते पाहून आमच्या सर्व ग्रुपला खूप आनंद झाला. परंतु मला जो आनंद झाला तो मात्र कायमस्वरूपी टिकला. बाकीचे मित्र थोड्याच दिवसात आपल्या संसारात पुन्हा गुरफटून गेले.

मी मात्र तेथून आल्यावर खूपच खुश होतो. **परमपिता शिव परमात्मा या सृष्टीवर अवतरीत झाला आहे. आपल्या आत्मारूपी मुलांना सत्य गीता ज्ञान देत आहे. या ज्ञानाच्या धारणेनेच मानव देवता बनतो. ही गोष्ट माझ्या मनावर बिंबली होती.** त्यामुळेच मी गावातील ब्रह्माकुमारीज् विद्यालयात जाऊन साप्ताहिक कोर्स केला व नियमित मुरली क्लासला जाऊ लागलो. सुरुवातीला काही महिने मला ज्ञान समजले नाही कारण भक्तिमार्गातील अनेक अंधश्रद्धा दूर व्हायला बराच वेळ गेला. परंतु मधुबनचे ते मनोहर दृश्य सतत माझ्या डोळ्यासमोर फिरत होते. तेथे पुन्हा जावेसे वाटत होते. त्यामुळे त्याच वर्षात दुसऱ्यांदा मी मधुबनला गेलो. **मधुबनचे पवित्र वातावरण, तेथील ब्रह्मावत्सांची मधुर वाणी, त्यांचा प्रेमळ, शांत व नम्र स्वभाव, दुसऱ्यांना देण्याची भावना, त्यांची तेजस्विता मनाला खूप भावली. त्यांच्या सहवासामुळे मी ईश्वरी परिवाराचा कायमस्वरूपी सदस्य कसा बनलो हे समजले सुद्धा नाही.**

आज मागे वळून पाहताना मागील आठवणी येतात. शिवबाबांनी कुठून कुठे नेले, हे कळले सुद्धा नाही. दिवसामागून दिवस गेले व मी पक्का ब्रह्माकुमार बनलो. ईश्वरी ज्ञान व सहज राजयोगाच्या अभ्यासाने जीवन पूर्णतः बदलून गेले. राजयोग ही जीवन जगण्याची कला आहे, याचा अनुभव आला. मी गृहस्थी (अधरकुमार) असल्याने तसेच जिल्हा परिषदमध्ये शिक्षकाची नोकरी करीत असल्याने जीवनात कसे जगावे यासाठी राजयोगाचा खूप उपयोग झाला. **प्रामुख्याने माझ्या स्मृती, वृत्ती, दृष्टी व कृतीत परिवर्तन घडून आले. आपण सर्व आत्मे, एक परमात्मा शिव पित्याची मुले असल्याने भाऊ-भाऊ आहोत, ही स्मृती सदैव जागृत राहिल्याने आत्मिक बंधुत्वभाव, स्नेह, सहयोग, शुभभावना व शुभकामना मनात भरून राहिली. फलस्वरूप, सारे विश्व हा एक परिवार आहे असे वाटू लागले. बघता-बघता माझे संपूर्ण जीवनच बदलून गेले.**

वास्तविक मी खूप गरीब कुटुंबातला. मला कुणाचे मार्गदर्शन नव्हते. कसेबसे शिक्षण पूर्ण करून मी शिक्षकाची नोकरी करीत होतो. एक चाकोरीबद्ध जीवन जगत होतो. कुणाशी फारसे संबंध नव्हते. परंतु ईश्वरी परिवारात आल्या-नंतर माझे संबंध खूप गुणवान, धनवान व ज्ञानवान लोकांशी आले. त्यांच्या सहवासामुळे मला खूपच समाधान लाभले. मला ही गोष्ट प्रकर्षाने जाणवली की ईश्वरी परिवारात गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, काळा-गोरा, बुद्धिवान-बुद्धिहीन असा कुठलाही भेदभाव केला जात नाही. सर्वांविषयी शुभभाव व श्रेष्ठभाव अनुभवाला आला. विशेष म्हणजे मधुबनला सेवेसाठी गेल्यावर मला याची प्रचिती आली.

सन २००६ मध्ये शाळेला सुट्टी लागल्यानंतर मी मधुबनला सेवेसाठी गेलो होतो. त्यावेळी मला पांडव भवन-मध्ये सेवेची संधी मिळाली. व्ही.आय.पी. किचनमध्ये ब्र.कु.सुरेंद्रभाई यांचा मदतनीस म्हणून मी दीड महिना सेवेसाठी राहिलो. त्यांचा स्वभाव अतिशय प्रेमळ व गुणी असा आहे. त्यांनी मला दीड महिन्यात खूप सुंदर अनुभव सांगितले. ज्ञानाची गुह्यता समजावून सांगितली. मीदेखील किचनची सेवा खूप मनापासून केली. रोज किचनमधील सेवा आटोपल्यानंतर किचनची साफ-सफाई मी मोठ्या आनंदाने व शिवबाबांच्या आठवणीत करीत असे. त्यामुळे माझ्यातील हा सेवाभाव पाहून सुरेंद्रभाई नेहमी म्हणायचे

की 'आप हर साल छुट्टी में सेवा के लिए आते रहना। आप टीचर होकर भी इतनी नम्रतासे सेवा करते हो, तो रिटर्न में शिवबाबा भी आपको सब कुछ देगा। आपको एक दिन 'आदर्श टीचर' का अवार्ड जरूर मिलेगा।' मधुबनमध्ये सेवा करताना मला खुशी होत असे. ज्या दादी-दीदी आपण केवळ टि.व्ही.वर पहातो, त्यांना भेटण्याची, त्यांच्याशी वार्तालाप करण्याची संधी प्राप्त होते. मधुबन ही पिताश्री ब्रह्माबाबांची कर्मभूमी, चरित्रभूमी असल्याने, तेथील वायब्रेशन अतिशय शक्तिशाली आहेत. त्यामुळे योगाचे सुंदर अनुभव मधुबनच्या वातावरणात अगदी सहज होतात. मधुबनमधील ते मंतरलेले दिवस आजही आठवतात. त्या स्मृती अतिशय आनंददायी अशा आहेत. फलस्वरूप मी स्वतःला खरोखर सौभाग्यशाली समजतो. त्याचबरोबर माझ्या अंतरंगी सदैव पुढील शब्द उमटतात -

**मीठा मधुबन देखके बाबा, याद तुम्हारी आती है।**
**तेरी कर्मभूमी बाबा, याद तुम्हारी दिलाती है।**

ज्ञानात आल्यानंतर सुरूवातीला जो उत्साह होता, तो आजही आहे किंबहुना तो द्विगुणीत झाला आहे. ज्ञान-मार्गातील १२ वर्षाच्या कालखंडात अनेक परीक्षा आल्या, पारिवारीक समस्या आल्या, ब्राह्मण परिवारात स्वभाव-संस्काराचे थोडेसे टकराव झाले, परंतु प्राणेश्वर बापदादांवरील विश्वास, प्रेम कधीच कमी झाले नाही, उलट दिवसेंदिवस ते वाढतच गेले. मी जेव्हा बापदादांना पहिल्यांदा भेटायला गेलो होतो तेव्हा मनोमन ठरवले होते की, 'लाख करे दुनिया, तेरा साथ न छोडेंगे।' आणि खरोखर आजवर झालेल्या सर्व परीक्षेत मी पास झालो. यासाठी मला एक विशेष गुण फारच उपयोगी ठरला, तो म्हणजे मधुरता. या गुणामुळे **मी मागील १२ वर्षात, माझ्या संपर्कात आलेला एकही माणूस सोडला नाही की ज्याला मी शिवबाबांचा परिचय दिला नाही. माझ्या नोकरीच्या गावात, पाहुण्यांकडे गेल्यावर, प्रवासात मला कोणीही भेटले तरी त्याला ईश्वरी संदेश अवश्य देतोच. माझ्या या स्वभावामुळे मला सर्वजण 'ओम् शांतीचे सर' म्हणून संबोधतात.**

**ईश्वरी ज्ञानाची धारणा केल्याने एक साधारण व्यक्ती, महान बनू शकतो याचा मला जीवनात अनुभव आला.** त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील सर्व अधिकारी मला सन्मान देऊन, माझे कोणतेही काम सर्वप्रथम पूर्ण करतात. ज्ञानात आल्यावर माझी आर्थिक दृष्ट्यासुद्धा भरभराट झाली, कारण ज्ञानात आल्यावर अनावश्यक तसेच व्यर्थ खर्च (फॅशन, छानछोकीपणा, हॉटेलिंग, पिक्चर पहाणे यावरील खर्च) आपोआपच बंद झाले तसेच श्रीमतानुसार आचरण केल्याने स्वास्थ्य उत्तम राहिले. **माझ्या परिवारात १२ वर्षाच्या काळात आरोग्यावर शून्य रुपये खर्च झाला. त्यामुळे आपल्या हे लक्षात येईल की राजयोग ही जीवन जगण्याची कला आहे. 'साधी रहाणी व उच्च (ईश्वरी) विचार सरणी' हे त्यामागील रहस्य आहे.**

ज्ञानात आल्यापासून अमृतवेळेला राजयोगाचा अभ्यास मी नियमितपणे करतो. रात्री कितीही उशीर झाला किंवा घरी पाहूणे असले तरी मी हा नित्यक्रम मोडत नाही. मी रोज शिवबाबांशी वार्तालाप (रुहरिहान) करतो. सेंटरच्या बहिणींनी अथवा वरिष्ठ भाईंनी कोणतीही सेवा सांगितली तरी मी कधीच नाही म्हणत नाही, त्यामुळे भारतातील अनेक सेवाकेंद्रावर जाण्याची मला संधी प्राप्त झाली. फलस्वरूप ब्राह्मण परिवाराशी मोठ्या प्रमाणावर अलौकिक संबंध प्रस्थापित झाले. ज्ञानात येण्यापूर्वी लौकिक परिवार अत्यंत मर्यादित स्वरूपाचा होता परंतु आता खरोखरच बेहदचा परिवार, विश्व हाच एक परिवार अनुभवाला येतो.

माझा शाळेतील कामाचा उमंग-उत्साह पाहून, सर्व सहकारी शिक्षक मला नेहमी म्हणतात की तुम्ही नेहमी आनंदात असता. तेव्हा मी त्यांना सांगतो की मी एका युनिव्हर्सिटीत शिकतो, जिचे नाव आहे 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालय'. त्या निमित्ताने अनेकांना शिवबाबांचा परिचय दिला जातो. नुकताच सप्टेंबर २०१४ मध्ये फिरोदिया फाऊंडेशन तर्फे 'आदर्श शिक्षक' हा पुरस्कार देऊन माझा गौरव करण्यात आला. रुपये ५००१ रोख, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्रक असे पुरस्काराचे स्वरूप होते. ज्येष्ठ समाजसेवक श्री.अण्णा हजारे व श्री.पोपटराव पवार यांच्या शुभहस्ते माझा सन्मान झाला. या पुरस्काराने मला खूप आनंद झाला कारण एक साधारण व्यक्ती शिवबाबांच्या श्रीमतानुसार तन्मयतेने चालला तर आदर्श

बनू शकतो याचे हे प्रत्यक्ष प्रमाण होते.

सत्कार समारंभात श्री. अण्णा हजारे यांच्या भाषणातील एक वाक्य मला फार आवडले. ते म्हणाले की ज्या झाडाला गोड फळे येतात लोक त्यालाच अधिक दगड मारतात तसेच जे चांगल्या मार्गावर, सत्यतेने चालतात, सर्वच लोक त्यांची परीक्षा घेतात. मला पुरस्कार मिळाल्यावर मी मधुबनच्या सुरेंद्रभाईंना फोन करून सांगितले तसेच एक दिवस तुम्ही आदर्श टीचर बनाल या त्यांच्या वाक्याची आठवणही करून दिली. त्यांना देखील या गोष्टीचा फार आनंद झाला.

शेवटी सर्व वाचक बांधवांना मी हेच सांगू इच्छितो की शिवबाबाच आपला खरा साथी आहे, बाकी सारी दुनिया ही केवळ मतलबी वा स्वार्थी आहे. त्यामुळे इतरांच्या कामात वेळ न घालविता, जितका वेळ शिवबाबांच्या सेवेसाठी देऊ, तितके आपण जीवनात सफल होऊ. आता समयानुसार आपल्याला सेवा, सेवा आणि सेवा हीच एक धुन लागली पाहिजे. मनसा, वाचा व कर्मणा तिन्ही प्रकारे विश्वसेवेसाठी तत्पर रहायला पाहिजे. **माझे सेंटर, माझा झोन या लहान-सहान सेवेच्या परिघात स्वतःला बंदिस्त न करता विश्व कल्याणाचे कर्तव्य केले पाहिजे, ते देखील कुठलीही अपेक्षा न ठेवता म्हणजे ड्रामानुसार आपल्याला सर्व काही अवश्य प्राप्त होईल, हाच माझा अनुभव आहे. सारांशाने असे म्हणता येईल,**

**विश्व बदलण्या पुन्हा लाभली, संधी सांप्रत काळी,**
**सेवा करा तुम्ही शिवबाबांची, भरूनी घ्या आपुली झोळी ।।**

▶ पान क्र. २२ वरून

**बंधुनो, महाविनाशात अशी काही मायावी परिस्थिती निर्माण होईल की, त्यावेळी काम, क्रोध, लोभ व अहंकार हे विकार तुमच्यावर वार करणार नाहीत परंतु हा खतरनाक व दगाबाज मोह मात्र सर्वांवर वार करेल. मायेचा तो वार होऊ द्यायचा अथवा स्व-स्थितीच्या मजबूत ढालीवर त्याला झेलावयाचे हे सर्वस्वी तुमच्या हातात असेल.** अत्यंत दुष्ट व क्रूर असलेल्या मायेच्या वारांनी अलौकिक वृक्षाची अनेक फळे गळून पडतील परंतु निश्चयाचे देठ मजबूत असलेली फळे मात्र आपले स्थान सोडणार नाहीत. हीच ती सतोप्रधान मनुष्य सृष्टीच्या आरंभीची रचना होय. केवळ या श्रेष्ठ रचनेलाच आदि देव अथवा आदि देवी ही महान उपाधी दिली जाते. जर अशी उपाधी प्राप्त करावयाची असेल तर पूर्णतः कर्मातीत होणे अपरिहार्य आहे. जितके तुम्ही नष्टोमोहः व्हाल तितकीच आदि, अनादि स्वरूपाच्या दिव्य स्मृतीची ज्योत प्रज्वलित होईल. मोहमुक्त व जीवनमुक्त स्थिती ही ब्रह्माबापसमान कर्मातीत स्थिती प्राप्त करण्याचा पाया आहे. हा पाया तुम्ही मजबूत केलात की, कर्मातीत बनणे हा तुमचा जन्मसिद्ध अधिकार असेल. हा अधिकार परमात्म्याने समस्त ब्रह्मावत्सांना दिलेला आहे. फक्त त्या अधिकाराची क्षमता आत्म्यांत निर्माण करणे महत्वाचे आहे. ❖❖❖

▶ पान क्र. १७ वरून

मनाला मोह पाडणारा आवाज ऐकायला मिळणार नाही. पण बाबा अव्यक्त झाल्यानंतरही रोज तसेच स्वयंपाकघरात चक्कर मारत असताना नजरेस पडतात.

बाबा अव्यक्त झाल्यावर मी स्वतःला एकटे जरूर अनुभवले होते आणि मला बरेच दुःख झाले होते. माझे मन रडत होते की बाबांशिवाय माझे जीवन आता कसे व्यतीत होईल? एका दिवसाची गोष्ट आहे. माझी तब्येत या चिंतेपायी फारच बिघडून गेली होती आणि मला अहमदाबाद मधील हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात येणार होते. **त्या दिवशी अव्यक्त बाबा आले होते. बाबांनी मला बोलावून आपल्या-पाशी बसवून माझ्या साऱ्या शरीरावर हात फिरविला होता आणि म्हटले होते, मुली, तू मायानगरीत जाऊ नकोस. बाबा तुझ्यासाठी वतनमधून औषध पाठविल. बाबांनी तेव्हा माझ्यावर फार प्रेम केले. पहाणाऱ्यांच्या मनात पुराणातील गाथा प्रगट झाली होती आणि मी बाबांची दृष्टी मिळाल्याने स्वस्थ झाले होते नंतर मी अहमदाबादला गेले नाही.**

माझ्या अलौकिक जीवनात पुरुषार्थ करताना मी प्रामुख्याने पुढील पाच गोष्टींकडे विशेष लक्ष दिले - १) माझ्याद्वारे कोणालाही दुःख होऊ नये. २) माझ्या मुखाने सेवेसाठी कधीही 'ना' शब्द निघू नये. ३) बाबांच्या भंडाऱ्यातून सर्वांनी संतुष्ट होऊन जावे. ४) आपल्या हातून यज्ञाचे थोडेसुद्धा नुकसान होऊ नये. ५) कोणत्याही गोष्टीला लगेच बिंदी लावून मला सदैव उपराम (तटस्थ) स्थितीत रहायचे आहे. ***(भावानुवाद - ब्र. कु. शिला, औरंगाबाद)***